सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

जानेवारी २०२५ । पृष्ठे : ५२

महाराष्ट्र

आरोग्य पत्रिका

कुष्ठ रुग्णांसाठी लाभाच्या शासकीय योजना

मा. नामदार
श्री. प्रकाशराव आबिटकर साहेब

आरोग्य सेवा आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य
मुंबई

आरोग्य सेवा आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य
मुंबई

महाराष्ट्र
आरोग्य पत्रिका

वर्ष : सत्ताविसावे | अंक : १ | महिना : जानेवारी २०२५

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

मुख्य संपादक/प्रकाशक
डॉ. कैलास बाविस्कर
उपसंचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.)

सह संपादक
डॉ. संजयकुमार जठार
सहायक संचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.)

संपादन सहाय्य
श्री. प्रशांत तुपकरी
जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी

श्री. सुनिल अलगुडे
जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी

श्री. महादेव गिरी
प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा

E-आवृत्ती
राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग
'परिवर्तन, आरोग्य भवन,
विश्रांतवाडी पोलिस स्टेशन समोर,
येरवडा, पुणे ४११ ००६

पत्रव्यवहारासाठी पत्ता

संपादक,
राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग
'परिवर्तन', आरोग्य भवन परिसर,
विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर,
येरवडा, पुणे ४११ ००६.
दूरध्वनी : ०२०-२६६१०१७८,
२६६१०१७९.
फॅक्स : ०२०-२६६१०१८०

e-mail :
ddhsiec.creatives@gmail.com

आरोग्य मंत्रांच्या हस्ते रुग्णवाहिका व लसवाहिका लोकार्पण सोहळा

मोबाईल हेल्थ

राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे द्वारा प्रकाशित

https://www.facebook.com/MahaArogyaIECBureau

https://twitter.com/MahaHealthIEC

https://www.instagram.com/mahahealthiec/

http://bit.ly/MahaArogyaYT

https://www.linkedin.com/company/maha-arogya-iec-bureau

संकेत स्थळ :
http.//maha-arogya.gov.in
http.//mahaarogyasamvadiec.in
maharogyasamvad

महाराष्ट्र
आरोग्य पत्रिका

जानेवारी - २०२५

अंतरंग

- आयुक्तांचे मनोगत ५
- संचालकांचे मनोगत (मुंबई) ६
- संचालकांचे मनोगत (पुणे) ७
- संपादकीय ८
- राज्यातील जनतेचे आरोग्य जपण्याचे काम करणार प्रकाश आबिटकर, आरोग्य मंत्री ९
- सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची औंध जिल्हा रुग्णालय आणि येरवडा मनोरुग्णालयाला भेट ११
- महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर १३
- पाच कोटींपेक्षा अधिक नागरिकांचे कुष्ठरोग शोध अभियान अंतर्गत होणार सर्वेक्षण १४
- नव्या वर्षात संकल्प निरोगी आयुष्याचा १५
- मुलींच्या जन्माकडे सकारात्मकतेने बघा १७
- राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रम "१०० दिवस मोहीम" १९
- देश का प्रकृती परीक्षण अभियानास सुरुवात २१
- जागतिक युनानी दिवस २२
- प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचे २०१७ ते मार्च २०२४ कालावधीत ३५,२६,२६५ लाभार्थी २७
- 'मानसिक आरोग्य २९
- सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विशेष नवजात काळजी कक्षांमध्ये चार वर्षांत २,७७,११४ बालकांवर यशस्वी उपचार ३२
- गोष्टी सांगा, बारीक व्हा ३३
- स्त्री सन्मान ३५
- स्त्री सन्मान (कविता) ३७
- वंधत्व निवारण्यासाठी नांदेड जिल्हाधिकारी यांनी उचलले मोलाचे पाऊल ३८
- यशोगाथा - यशस्वी बदलाची प्रेरणादायी कहाणी ३९
- आशा संवाद ४०
- कविता ४५
- वृत्त विशेष ४६
- लेखकांना विनंती ५०
- विभाग स्तरीय रुग्णवाहिका व लसवाहिका लोकार्पण सोहळा ५१

राज्यातील जनतेचे आरोग्य जपण्याचे काम करणार प्रकाश आबिटकर, आरोग्य मंत्री

सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची औंध जिल्हा रुग्णालय आणि येरवडा मनोरुग्णालयाला भेट

आरोग्य मंत्रांच्या हस्ते रुग्णवाहिका व लसवाहिका लोकार्पण सोहळा

आयुक्तांचे मनोगत

आरोग्य ही प्रत्येक व्यक्तीची मूलभूत गरज आहे. शासकीय पातळीवर सार्वजनिक आरोग्य सेवेसाठी अनेक उपाययोजना करण्यात येतात. आपले शरीर व मन निरोगी असेल तर आपले जीवन सुसह्य व आत्मविश्वासाने भरलेले असते. त्यामुळेच प्रत्येक नागरिकाने आपले आरोग्य जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ग्रामीण व नागरी भागातील लोकांचे आरोग्य निरोगी राखण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण, लोकोपयोगी योजना गेल्या काही वर्षात राज्यामध्ये लागू करण्यात आलेल्या आहेत. ग्रामीण तसेच शहरी भागातील सरकारी आरोग्य केंद्रांच्या गुणवत्तेमध्ये वाढ झालेली असून त्यांना अधिक बळकटी देण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

राज्यातील जनतेला मोफत, मुबलक व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचे आरोग्य विभागाचे उद्दिष्ट असून त्या दृष्टीने आरोग्य यंत्रणा प्रयत्नशील आहेत. अधिकाधिक लोकांनी सार्वजनिक आरोग्य सेवेकडे वळावे, यासाठी लोकांमध्ये सरकारी आरोग्य सुविधांबद्दल व्यापक जनजागृती आवश्यक असल्याने विविध माध्यमांद्वारे लोकांपर्यंत पोहचविण्याचे प्रयत्न देखील विभागामार्फत सुरू आहेत. यामध्ये सर्व स्तरांतील घटक, लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, आरोग्य यंत्रणा व जागरूक नागरिकांचा सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे.

कुष्ठरोग निर्मुलनासाठी लोकांमध्ये आवश्यक जनजागृती यावी यासाठी "स्पर्श" जनजागृती अभियान जानेवारी महिन्यात २६ जानेवारीपासून राज्यभर राबविण्यात येणार आहे. तसेच ३० जानेवारी रोजी कुष्ठरोग निवारण दिन असून ३१ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२० या कालावधीत कुष्ठरोग निवारण पंधरवडादेखील साजरा करण्यात येणार आहे. कुष्ठरोगाच्या समूळ उच्चाटनासाठी केंद्र शासनाच्या सहयोगाने व्यापक मोहीम हाती घेण्यात आली असून त्या दिशेने विभागाचे प्रयत्न सुरु आहेत.

जानेवारी महिन्यात कर्करोग जनजागृती तसेच धुम्रपान विरोधी दिन साजरा होत आहे. युवकांमधील वाढत चाललेले धुम्रपान आज चिंतेचा विषय असून त्यांना व्यसन व धुम्रपानापासून परावृत्त करण्याचे मोठे आव्हान आज आपणा सर्वांसमोर आहे. शालेय व महाविद्यालयीन मुलांना या व्यसनांपासून दूर ठेवण्याची मोठी जबाबदारी पालक व शैक्षणिक संस्थांची आहे. केंद्र शासनाच्या सहयोगाने राज्यामध्ये राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत असून या कार्यक्रमांतर्गत व्यसनमुक्तीसाठी व्यापक उपाययोजना करण्यात येत आहेत,

निरोगी आयुष्यासाठी सर्वांना शुभेच्छा!

श्री. अमगोथू श्री रंगा नायक
आयुक्त, आरोग्य सेवा तथा
अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान,
महाराष्ट्र राज्य

संचालकांचे मनोगत

'संकल्प निरोगी महाराष्ट्रा'चा या ध्येयाने शासनाच्या वतीने सामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवून वेगवेगळ्या योजना व उपक्रम राज्यात राबविण्यात येत आहेत. समाजाचे, कुटुंबाचे व प्रत्येक व्यक्तीचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी शहरापासून ते गाव पातळीपर्यंत आरोग्य सेवा पुरविण्यासाठी राज्य शासनातर्फे प्रयत्न करण्यात येत आहेत. सार्वजनिक आरोग्य सेवेच्या माध्यमातून लोकांना आरोग्य सुविधा अधिक सक्षम व दर्जेदार पुरविण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत.

अनेक महत्त्वपूर्ण निर्णय आणि उपक्रम गेल्या वर्षभरात राज्यात राबविण्यात आलेले आहेत. आरोग्य क्षेत्रात देशात महाराष्ट्र अग्रेसर असून राष्ट्रीय स्तरावर पुरस्कारही महाराष्ट्राला प्राप्त झाले आहेत. सामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवून निरोगी महाराष्ट्राच्या दिशेने सार्वजनिक आरोग्य विभाग वाटचाल करतो आहे. आरोग्यविषयक सरकारी योजनांना समाजाचाही मोठा सहभाग लाभतो आहे. लोकसहभागातूनच आरोग्य सेवा अधिक सक्षम होणार असल्यामुळे निरोगी समाज घडविण्यासाठी या योजनांचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे.

माता आणि बालकांचे आरोग्य व पोषण वृध्दिंगत व्हावे व प्रत्येक गरोदर स्त्रीला सुदृढ निरोगी अशा अपत्याची प्राप्ती व्हावी, यासाठी देण्यात येणाऱ्या एकत्रित सेवांना माता आणि बाल आरोग्य सेवा असे म्हणतात. माता व बालकांचे आरोग्य, विशेष जोखमीचे गट तसेच आरोग्य सेवा पुरविण्यासाठी मानवी साधन व प्रतिबंधात्मक उपचारात्मक सेवा याबाबत वेगवेगळ्या सेवांचे नियोजन करून सर्वांसाठी आरोग्य या संकल्पनेद्वारे आरोग्य सेवा पुरविण्याचा शासन नेहमी प्रयत्न करत आले आहे. सुरक्षित मातृत्व, बालकांचे जीवन रक्षण व बालकांच्या कल्याणाचे कार्य यांना शासनाने नेहमीच प्राधान्य दिले आहे. त्याचप्रमाणे प्रसूती सेवांचा विकास, प्राथमि क आरोग्य केंद्राद्वारे सेवा, बहुउद्देशीय कर्मचारी योजना, एकात्मिक बाल विकास अशा वेगवेगळ्या माध्यमातून लोकांना आरोग्य सेवा देण्यासाठी शासनाने वेगवेगळ्या कार्यक्रमाची गरजेनुसार आखणी केली आहे.

आपण सर्वांनी शासनाच्या प्रत्येक योजनेची माहिती लोकांपर्यंत पोहोचवून त्या समाजात अधिक गतिमान करण्यासाठी व आरोग्य सेवेला अधिक सक्षम, दर्जेदार व विश्वासार्ह करण्यासाठी आपला सहभाग नोंदवू या व महाराष्ट्र राज्याला निरोगी ठेवण्यात आपली भूमिका पार पाडू या. प्रत्येकाचा सहभाग हा विकासासाठी आवश्यक असल्यामुळे आपण आपली भूमिका अधिक चांगल्या प्रकारे बजावून आरोग्य सेवेला अधिक सक्षम करू या व महाराष्ट्राला निरोगी ठेवू या.

डॉ. नितीन अंबाडेकर
संचालक, मुंबई

संचालकांचे मनोगत

आरोग्याचे महत्त्व व आरोग्यविषयक माहिती मिळविण्यासाठी इच्छा, प्रयत्न, ज्ञान यावर आरोग्य प्राप्ती अवलंबून असते. उत्तम आरोग्याला मानवी जीवनात अत्यंत महत्त्वाचे असे स्थान आहे. सभोवतालची परिस्थिती व वर्तन रोगासाठी संधी शोधत असते. असंख्य रोग, जंतू व्यक्तीवर आक्रमण करण्याची संधी शोधत असतात. त्यावर यशस्वी प्रतिकार करण्यासाठी प्रतिबंधात्मक ज्ञान असणे आवश्यक असते. प्रतिबंधात्मक ज्ञानाद्वारे आरोग्य रक्षण होते व संभाव्य धोके टाळता येतात. आरोग्य चांगले राहण्यासाठी तसेच आजारांचा सामना करण्यासाठी प्रतिबंधात्मक ज्ञानाची आवश्यकता असते. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाययोजनांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

आरोग्य शिक्षणामुळे आजार, औषधोपचार यावर होणाऱ्या खर्चावर नियंत्रण मिळविता येते. आजार प्रतिबंधासाठी माहिती देणे, वर्तणुकीत बदल करण्यासाठी माहिती, शिक्षण, संवादाच्या माध्यमातून आरोग्यदायी जीवनशैलीसाठी प्रयत्न केले जातात. आरोग्य शिक्षणामुळे आरोग्याविषयी ज्ञान प्राप्ती होऊन व्यक्तीच्या दृष्टिकोनात बदल घडून येतात. असंसर्गजिन्य रोग व त्याचे प्रमाण समाजामध्ये वाढताना दिसत असल्यामुळे संसर्गजिन्य रोगांना प्रतिबंध करण्यासाठी व आरोग्यदायी सवयींचा अवलंब करण्यासाठी महत्त्व द्यावे लागणार असल्यामुळे आरोग्य संस्थांच्या माध्यमातून व आरोग्यवर्धिनी केंद्रांच्या माध्यमातून निरोगी महाराष्ट्र घडविण्यासाठी विविध योजना समाज घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी व्यापकपणे शासन प्रयत्न करत असून, सामान्यांना चांगली आरोग्य सेवा देण्यासाठी पुढाकार घेत आहे.

निरोगी महाराष्ट्राच्या दृष्टीने ही नक्कीच सकारात्मक बाब आहे. रोग होऊच नये म्हणून जीवन शैलीत थोडा बदल करून चांगल्या सवयी अंगीकारणे, व्यायाम, योगा यालाही महत्त्व देणे, व्यसनांपासून दूर राहणे, यासाठी लोकसहभाग वाढवणे अत्यंत महत्त्वाचे असल्यामुळे ग्राम पातळीपर्यंत जनजागृतीचे उपक्रम घेण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. सर्वांना सेवांचा लाभ व्हावा यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा असून लोकांपर्यंत पोहोचण्याचा शासनाच्या वतीने प्रयत्न केला जात आहे. यात समाजाचाही चांगला सहभाग मिळत असून निरोगी महाराष्ट्र घडविण्यासाठी प्रत्येकाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. .

सध्याच्या बदलत्या आजारांचा विचार करता असांसर्गिक रोगाबाबत जागरूकता वाढविणे आवश्यक आहे. आरोग्यवर्धिनी मंदिरच्या माध्यमातून या विषयीच्या सेवा गावपातळीपर्यंत पोहचविण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. यामुळे प्राथमिक आरोग्य सेवा सामान्य माणसापर्यंत तळागाळापर्यंत पोहचण्यास महत्त्वाची ठरणार आहे. बदलत्या वातावरणाचा आरोग्यावर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेता सर्वांनी आपल्या आरोग्याची उचित काळजी घ्यावी. आजाराची लक्षणे दिसल्यास नजिकच्या शासकीय दवाखान्यात जाऊन आवश्यक चाचण्या व उपचार करावेत.

डॉ. स्वप्नील लाळे
संचालक, शहरी आरोग्य

संपादकीय

सार्वजिनिक आरोग्य सेवेत सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून गावपातळी, तालुका, शहर या ठिकाणी आरोग्य सेवा देण्यासाठी आरोग्य सेवेचे जाळे भक्कमपणे तयार झालेले असून सामान्य माणसांना प्रतिबंधात्मक व आरोग्य संवर्धनात्मक तसेच उपचारात्मक सेवा दिल्या जात आहेत. रुग्ण हा केंद्रबिंदू मानून त्याला आवश्यक असणा-या सोयी सुविधा देण्यासाठी शासनातर्फे विविध योजना व उपक्रम तसेच सोयी-सुविधा विविध आरोग्य संस्थांच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या जात आहेत. यामुळे सामान्य माणसाला आरोग्य विषयक सेवा आणि सल्ला हा अत्यंत जवळच्या ठिकाणी मिळणे सुलभ झाले आहे. सामान्य जनतेपर्यंत आरोग्य सेवा देण्यासाठी शासन करीत असलेल्या प्रयत्नांना यश मिळत आहे.

सामान्य नागरिकांचा आरोग्यावरचा खर्च कमी व्हावा या दृष्टीने या विविधांगी योजना शासनाच्या वतीने राबविण्यात येत आहेत. या योजनांचा लाभ सामान्य माणसापर्यंतही आता पोहोचू लागला असून आरोग्याबाबतची जनजागृती ही वाढली आहे. रुग्णांना उपचारासाठी औषधे दवाखान्यातूनच मोफत मिळू लागल्यामुळे सरकारी दवाखान्याकडे लोकांचा कलही वाढलेला आहे. सर्व रुग्णांना विशेषता गरीब निरक्षर रुग्णांना दवाखान्यांमध्ये चांगले उपचार व सेवा मिळू लागली आहे, तसेच उपचारासाठी गरज लागल्यास तीही पुरवली जात आहे. यामुळे सार्वजिनिक आरोग्य सेवा लोकाभिमुख होण्याकडे कलही वाढलेला आहे. आरोग्य मंदिरमध्ये तेरा प्रकारच्या सेवा सुविधा चांगल्या प्रकारे मिळू लागल्यामुळे या सेवांचा लाभ याकडे कल जास्त असल्याचे आता दिसून येत आहे.

सार्वजिनिक आरोग्य सेवा अधिक विस्तारित व लोकाभिमुख झाल्यामुळे तसेच सेवा सुविधांमध्ये सक्षमपणे बदल घडून येत असल्यामुळे सामान्य माणसाला आरोग्य सेवा ही आपली वाटू लागली आहे. यात जनतेचा सहभाग वाढत असून शासनाच्या वतीने ही आवश्यक असणा-या सुविधा सामान्य माणसापर्यंत पोहोचण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. ही राज्याच्या दृष्टीने अत्यंत मोलाची अशी बाब आहे .सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून तो निरोगी राहावा तसेच आजारी पडल्यास त्यास तात्काळ आरोग्य सेवा मिळावी या दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न केले जात असल्याचे आपल्या निदर्शनास येत आहे. राज्याच्या दृष्टीने निरोगी महाराष्ट्र घडविण्यासाठी हे एक महत्त्वाचे असे पाऊल आहे.

शासन जनता व संस्था यांच्या माध्यमातून सामान्यांना चांगल्यातली चांगली सेवा तसेच आवश्यक असणा-या सेवा सुविधा पुरविण्यासाठी आरोग्य सेवेतील सर्व घटकांनी आपापले योगदान चांगल्या रीतीने देणे आवश्यक आहे. आपली भूमिका प्रामाणिकपणाची असली पाहिजे. आरोग्य सेवेचा एक महत्त्वाचा घटक म्हणून सर्वांनी आरोग्य सेवा देण्यासाठी आपापली भूमिका अधिक सजगतेने व प्रामाणिकपणे पार पाडणे आवश्यक आहे. सार्वजिनिक हिताच्या योजना सामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आपण सर्वजण योगदान देऊ या व महाराष्ट्राला निरोगी व आरोग्य संपन्न बनवू या.

सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

डॉ. कैलास बाविस्कर
संपादक

राज्यातील जनतेचे आरोग्य जपण्याचे काम करणार
प्रकाश आबिटकर, आरोग्य मंत्री

औषधांच्या नमुन्यांची तपासणी अंती दोषींवर कारवाई करण्याचे निर्देश

आरोग्य विभाग अंतर्गत राज्यातील साडेबारा कोटी जनतेचे आरोग्य जपण्याचे काम करण्याची जबाबदारी माझ्यावर आली आहे. रुग्णसेवेच्या माध्यमातून ईश्वरीय कार्य करण्याचे भाग्य मला लाभले आहे. निश्चितच या भूमिकेतून राज्यातील जनतेला सर्वोत्तम आरोग्य सुविधा देण्याचे काम करणार असल्याचे सांगत वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत पुरविण्यात आलेल्या औषधांच्या नमुन्यांची त्रयस्थ पद्धतीने तपासणी करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत.

आरोग्य भवन येथील सभागृहात आयोजित बैठकीत सार्वजनिक आरोग्य मंत्री झाल्यानंतर मंत्री श्री. आबिटकर यांनी विभागाचा आढावा घेतला. बैठकीला अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान सचिव नवीन सोना, वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत डांगे, आरोग्य सेवा आयुक्त अमगोथू श्री रंगा नायक, राज्य आरोग्य सेवा हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, आरोग्य सेवा संचालक डॉ नितीन आंबाडेकर, संचालक स्वप्निल लाळे यांच्यासह आरोग्य विभागातील विविध शाखांचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. आबिटकर म्हणाले, औषधांच्या नमुन्यांची तपासणी करताना यामध्ये दोषी आढळल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी. रुग्णालयांमध्ये चांगल्या दर्जाची व नामांकित कंपन्यांची औषधे पुरवण्यात यावी. सध्या देण्यात येत असलेल्या औषधांतील 'ड्रग कन्टेन्ट' तपासून घेण्यात यावा. खरेदी प्राधिकरण अधिक सक्षम करावे, त्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता असल्यास उपलब्ध करून देण्यात यावे. प्राधिकरणाची कंपन्यांशी झालेले दर करार तपासण्यात यावे. गरीब रुग्णांना मिळणारे औषध दर्जेदार असावे, याविषयी विशिष्ट कार्यपद्धती तयार करावी.

बॉम्बे नर्सिंग कायद्यानुसार नोंदणीकृत असलेल्या रुग्णालयांनी त्यांच्या तपासणीचे आणि सुविधांचे दर ठळक स्वरूपात रुग्णालयांमध्ये प्रसिद्ध करावे. कुठल्याही प्रकारे रुग्णांची आर्थिक फसवणूक होता कामा नये. राज्यात सुरू असलेल्या रक्त तपासणी व अन्य प्रयोगशाळांचे सनियंत्रण करण्यासाठी कायदा करण्यात यावा. प्रयोगशाळांच्या तपासणीसाठी भरारी पथके तयार करावी, याबाबतीत विशिष्ट कार्यपद्धती अंमलात आणावी.

सार्वजनिक आरोग्य विभागाची काही रुग्णालये वैद्यकीय शिक्षण विभागाकडे तात्पुरत्या स्वरूपात हस्तांतरित करण्यात आलेली आहे. रुग्णालयांचे याबाबतीत करार संपला असल्यास ती पुन्हा विभागाकडे घेण्याची प्रक्रिया पूर्ण करावी. विभागाकडे अत्यंत महत्त्वाचा असलेला मानसिक आरोग्य कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात यावा. सध्याच्या युगात मानसिक रुग्णांचे प्रमाण वाढत आहे. अशा परिस्थितीत विभागाकडे सद्यस्थितीत असलेल्या मनोरुग्णालयांचे सक्षमीकरण करावे. अत्यंत चांगल्या पद्धतीचे प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात यावे, असे निर्देशही मंत्री श्री आबिटकर यांनी दिले.

सद्यस्थितीत डायलिसिस, एमआरआय, सिटी स्कॅन तसेच अन्य रक्त चाचण्यांचे अहवाल विलंबाने मिळत असल्याच्या तक्रारी येत आहेत. यामुळे रुग्णांचे निदान उशीरा होऊन

उपचार योग्य पद्धतीने मिळत नाहीत. याबाबतीत सेवा घेतलेल्या कंपनीचे करार तपासण्यात यावेत. तपासणी अहवाल विलंबाने येण्याची चौकशी करावी. यासंदर्भात विभागाने समिती नियुक्त करून तातडीने चौकशी करावी. चौकशीत दोषी आढळल्यास कारवाई करावी, अशा सूचनाही मंत्री श्री. आबिटकर यांनी दिले.

मंत्री म्हणाले, आरोग्य विभागाच्या रुग्णालयांच्या इमारतींचे एक विशिष्ट मॉडेल तयार करावे. इमारत सुंदर असावी, रुग्ण रुग्णालयात आल्यानंतर बरा होऊनच घरी गेला पाहिजे. यासाठी विभागाने वास्तूविषारदांचे पॅनल तयार करावे. उत्कृष्ट दर्जाच्या इमारती असण्यासाठी आग्रह असावा. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असलेल्या पायाभूत सुविधा विकास शाखेचे बळकटीकरण करावे. या शाखेंतर्गत रुग्णालये, इमारतींची या पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यात यावी.

तसेच राज्यात शासकीय रुग्णालयांमध्ये स्वच्छता उच्च दर्जाची असावी. रुग्णांना मिळणाऱ्या जेवणाचा दर्जा उत्तम असावा. आयुष्मान कार्डच्या वितरणाला गती देण्यात यावी. योजनेअंतर्गत असलेल्या रुग्णालयांमध्ये रुग्णाला कुठेही पैसे लागू नये, अशा तक्रारी समोर आल्यास संबंधितांवर कारवाई करावी. महात्मा फुले जन आरोग्य अभियानातील अंगीकृत असलेल्या रुग्णालयांच्या कामकाज चुकीचे आढळल्यास चौकशी करून संबंधित रुग्णालय पॅनलवरून कमी करण्यात येईल. महिलांमध्ये सध्या कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. या पार्श्वभूमीवर महिलांमधील कर्करोगाचे निदान व तातडीने उपचार मिळण्यासाठी जिल्हास्तरावर तपासणी मोहीम राबवण्याचे निर्देशही मंत्री श्री. आबिटकर दिले.

बैठकीमध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान, वैद्यकीय अधिकाऱ्यांची पद भरती, सध्या उपलब्ध असलेले मनुष्यबळ व रिक्त पदे, मानसिक आरोग्य आस्थापना, डायलिसिस व अन्यसेवांचा विस्तार, अर्थसंकल्पीय तरतुदी, माता व बाल आरोग्य तपासणी कार्यक्रम, 15 व्या वित्त आयोगाचा निधी, राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम, नियमित लसीकरण, राष्ट्रीय किटकजन्य आजार नियंत्रण कार्यक्रम, सिकलसेल निर्मूलन कार्यक्रम, कर्करोग निदान कार्यक्रम, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय वृद्धापकाळ आरोग्य कार्यक्रम ,अंधत्वनियंत्रण कार्यक्रम ,महात्मा फुले जन आरोग्य अभियान, मोबाईल मेडिकल युनिट ,महाराष्ट्र वैद्यकीय आपत्कालीन सेवा आदींचे सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला.

प्रकाश आबिटकर आरोग्य मंत्री

सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची औंध जिल्हा रुग्णालय आणि येरवडा मनोरुग्णालयाला भेट

पुण्यातील विभागवार आरोग्य सेवांचा घेतला आढावा

राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी 3 जानेवारी येथील औंध जिल्हा रुग्णालय आणि येरवडा येथील प्रादेशिक मनोरुग्णालयाला भेट देऊन विविध विभागांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांची पाहणी केली. यावेळी त्यांनी थेट रुग्णांशी संवाद साधून त्यांना पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवेविषयी त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. त्यानंतर आरोग्य मंत्र्यांनी आरोग्य भवन येथील राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभागाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत पुण्यातील विभागवार आरोग्य सेवांचा आढावा घेऊन अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आरोग्य सेवांचा आढावा घेण्यासाठी आज पुणे दौऱ्यावर होते. त्यांनी औंध येथील जिल्हा रुग्णालयाला अधिकारी समवेत भेट देऊन विविध आरोग्य विभागांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांची पाहणी केली. यावेळी त्यांनी रुग्णांशी थेट संवाद साधून त्याच्या समस्या आणि प्रतिक्रिया जाणून घेतल्या. जिल्हा रुग्णालयात देण्यात येणाऱ्या सेवा, सुविधा, रुग्णालयातील विविध विभाग, बाह्यरुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग, माता बाल आरोग्य सेवा, नवजात विशेष काळजी कक्ष, डायलिसीस सेंटर, अस्थिरोग विभाग तसेच विविध सेवा विभाग यांना भेट देऊन आरोग्य सेवांची प्रत्यक्ष पाहणी केली.

आरोग्य मंत्र्यांनी येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयाला भेट देत संपूर्ण परिसराची पाहणी केली. महिला व पुरुष वार्ड, आहार कक्ष, पुनर्वसनात्मक सेवा विभागाला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील रुग्णांशी संवाद साधला. यावेळी रुग्णालयाच्या वतीने विविध विभागांमार्फत देण्यात येणाऱ्या सेवांविषयी सादरीकरण करण्यात आले. प्रादेशिक रुग्णालय बंगलोरच्या निम्हांस रुग्णालयाच्या धर्तीवर हे रुग्णालय कसे साकारले जाणार आहे, याविषयीचे सादरीकरण बांधकाम विभागाने केले. प्रादेशिक मनोरुग्णालय आदर्श कसे करता येईल, याविषयी आरोग्य मंत्र्यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधून आरोग्य मंत्री आबिटकर यांनी विविध विषयावर चर्चा केली. तसेच आरोग्य अधिकाधिक दर्जेदार आणि लोकाभिमुख कशी करता येईल यावर आपला भर राहील, असे प्रतिपादन केले.

पुणे येथील मलेरिया, कुष्ठरोग, माता व बाल संगोपन, परिवहन, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, आरोग्य प्रयोगशाळा, जन्म मृत्यू नोंदणी विभाग, आमाजिआ, कुटुंब कल्याण, जलजन्य आजार, हत्तीरोग या विभागांच्या कार्याविषयी आरोग्य भवन येथील राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग येथे झालेल्या बैठकीत माहिती घेतली व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

या बैठकीला डॉ. नितीन अंबाडेकर, संचालक, मुंबई, डॉ. विजय

बाविस्कर, अतिरिक्त संचालक, डॉ. बबिता कमलापूरकर सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप हत्तीरोग व जलजन्य रोग) डॉ. संदीप सांगळे सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग) डॉ. कैलास बाविस्कर उपसंचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे, डॉ. राजरत्न वाघमारे, उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजिआ), श्री. वैजनाथ गलांडे उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन) पुणे, श्री. विनोद फाले उपसंचालक, आरोग्य सेवा (राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे), डॉ. राधाकिसन पवार, उपसंचालक, आरोग्य सेवा (पुणे मंडळ, पुणे) डॉ. रेखा गायकवाड उपसंचालक, आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण), डॉ. संजयकुमार जठार, सहायक संचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे, डॉ. नागनाथ यमपल्ले, जिल्हा शल्यचिकित्सक, पुणे, डॉ. सचिन देसाई, जिल्हा आरोग्य अधिकारी, पुणे, डॉ. प्रेमचंद कांबळे सहायक संचालक, हत्तीरोग उपस्थित होते.

महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा

सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

मुंबई, दि. 09 : दुर्धर आजारांवरील उपचार व शस्त्रक्रीया या महागड्या उपचारांमध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना गरीबांना संजीवनी आहे. या योजनेच्या लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याचे निर्देश आज सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

अवयव प्रत्यारोपणसारख्या महागड्या शस्त्रक्रिया व उपचारांकरीता महात्मा फुले जनआरोग्य योजना आणि आरोग्य विभागाच्या अन्य योजनांची सांगड घालून संपूर्ण उपचार मोफत करण्यासाठी धोरण तयार करण्याबाबत सूचनाही मंत्री श्री. आबिटकर यांनी दिल्या.

आरोग्य भवन येथे आयोजित बैठकीत महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा आढावा सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी घेतला. बैठकीस आरोग्य सेवा आयुक्त अमगोथू श्री रंगा नायक, संचालक डॉ नितीन अंबाडेकर, राज्य हमी विमा सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. बोंदरे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

रस्ते अपघातामध्ये जखमींना नजीक व उपलब्ध असणाऱ्या कुठल्याही रुग्णालयात उपचार घेतलेल्या रूग्णांना योजनेचा लाभ देण्यासाठी धोरण तयार करण्याचे निर्देश देत मंत्री श्री. आबिटकर म्हणाले, योजनेच्या पोर्टलवर प्राप्त व प्रलंबित असलेल्या सुमारे 1075 तक्रारीबाबत तातडीने नोटीसेस देवून खुलासा घेण्यात यावा. तसेच आवश्यकतेप्रमाणे कठोर कारवाईची प्रक्रिया किमान 2 आठवड्यात पूर्ण करावी. याबाबत अंमलबजावणी सहाय्य संस्थेकडून प्राप्त तक्रारीवर तातडीने कार्यवाही होत नसल्यास व कारवाईचे प्रस्ताव समितीसमोर सादर केले जात नसल्यास आढावा घेवून अशा संस्थांवर कारवाई करावी. तक्रार निवारणाबाबत नव्याने प्रमाणीत कार्यपद्धती तयार करून कठोर कारवाईच्या तरतूदी कराव्यात.

मंत्री श्री. आबिटकर म्हणाले, योजने अंतर्गत रूग्णालयांच्या कामकाजाची गुणवत्ता तपासणी व मुल्यमापन करण्यासाठी

राज्य आरोग्य हमी सोसायटी मुख्यालयाकडून स्वतंत्र पथक स्थापन करावे. महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यांच्या अंमलबजावणीवर सनियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी जिल्ह्यातील विधीमंडळ सदस्यांचा समावेश असलेली संबंधित जिल्ह्यातील पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात यावी.

आयुष्मान कार्डच्या 100 टक्के वितरणाकरिता तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण, राष्ट्रीय सुचना व विज्ञान केंद्र, अन्न व नागरी पुरवठा विभागाची आरोग्य विभागासोबत संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात यावे. सध्या योजनेनुसार 1356 उपचार पद्धती आहे. या पद्धतींचा आढावा घेवून त्यामध्ये राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या उपचार पद्धतीपैकी आवश्यक उपचारांचा समावेश करणे, सध्याच्या उपचार पद्धतीत बदल किंवा सुधारणा करणे, नवीन उपचार पद्धतींचा समावेश, शासकीय रुग्णालयांच्या राखीव प्रक्रियापैकी काही उपचार आवश्यकतेप्रमाणे खाजगी रूग्णालयासाठी उपलब्ध करून देण्याबाबत तज्ज्ञांशी चर्चा करून प्रस्ताव तयार करण्यात यावे, असे निर्देशही यावेळी आरोग्य मंत्री यांनी दिले.

आरोग्य विभागातील सर्व योजनांच्या प्रचार व प्रसिद्धीकरीता जिल्हास्तरावर स्वतंत्र संपर्क यंत्रणा तयार करण्यात यावी. धर्मादाय रुग्णालये आणि शासकीय जमीन नाममात्र अथवा सवलतीच्या दराने दिलेल्या नामांकित रूग्णालयांना योजनेत समाविष्ट करून घेण्याकरीता प्रवृत्त करण्याच्या सूचनाही मंत्री श्री. आंबिटकर यांनी दिल्या.

पाच कोटीपेक्षा अधिक नागरिकांचे कुष्ठरोग शोध अभियान अंतर्गत होणार सर्वेक्षण

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत कुष्ठरोग निर्मूलनासाठी येत्या 31 जानेवारी ते 15 फेब्रुवारी या कालावधी दरम्यान प्रत्यक्ष घरोघर जाऊन कुष्ठरोग शोध अभियान राबविण्यात येणार आहे. ग्रामीण तसेच निवडक शहरी भागातील सुमारे पाच कोटीपेक्षा अधिक नागरिकांचे सर्वेक्षण या अभियानांतर्गत करण्याचे उद्दिष्ट आरोग्य विभागाने निश्चित केले आहे. कुष्ठरोग शोध अभियान लोकसहभागाद्वारे यशस्वी करावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम अंतर्गत सन 2024-25 या आर्थिक वर्षासाठी कुष्ठरोग शोध अभियान दि.31 जानेवारी ते 15 फेब्रुवारी 2025 कालावधीमध्ये राज्यात निवडक 20 जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. तसेच सर्व जिल्ह्यांमध्ये याच कालावधीत स्पर्श कुष्ठरोग जनजागृती मोहिम राबविण्यात येणार आहे. या अनुषंगाने मा. विरेंद्र सिंह, सचिव 2 सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली सदर अभियानाची राज्यस्तरीय समन्वय समितीची बैठक दि. 23/01/2025 रोजी मुंबईत मंत्रालयात पार पडली. मा. अमगोथू श्री रंगा नायक, आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, रा.आ. अ. मुंबई. डॉ नितीन अंबाडेकर, संचालक आरोग्य सेवा, मुंबई. श्री. शि.म. धुळे, उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई, श्री अनिरुध्द कुलकर्णी, अवर सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, श्री प्रशांत डोके, अवर सचिव ग्रामविकास विभाग, मंत्रालय, डॉ. संदिप सांगळे, सहसंचालक, कुष्ठ व क्षय, पुणे, डॉ. कैलास बाविस्कर, उपसंचालक, आयईसी ब्युरो, पुणे, डॉ. आर. एस. आडकेकर, सहाय्यक संचालक, कुष्ठरोग, पुणे, डॉ वि. वि.पै, संचालक बॉम्बे लेप्रसी प्रोजेक्ट मुंबई, श्री. व्हिन्सेंट के ए. कार्यक्रम व्यवस्थापक अलर्ट इंडिया,डॉ अमोल शिंदे, राज्य कार्यक्रम व्यवस्थापक, रा.आ.अ. मुंबई, श्री महेश हंशेट्टी, कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई या बैठकीला उपस्थित होते. डॉ. संदिप सांगळे, सदस्य सचिव तथा सहसंचालक आ.से. (कुष्ठ व क्षय) पुणे यांनी उपस्थितांचे स्वागत करून कुष्ठरोग शोध अभियान व स्पर्श जनजागृती मोहिमेविषयी उपस्थितांना सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

राज्यातील सर्व ग्रामीण व निवडक शहरी भागात आणि निवडक जिल्ह्यात कुष्ठरोग सर्वेक्षण करण्यात येणार आहे. यासाठी 70,768 शोध पथके तयार करण्यात आली असून, प्रत्यक्ष घरांना भेटी देऊन कुष्ठरोग व क्षयरोग रुग्णांचे सर्वेक्षण केले जाणार आहे.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त दि. 30 जानेवारी हा कुष्ठरोग निवारण दिन साजरा करण्यात येतो. या दिवशी कुष्ठरोग मुक्त महाराष्ट्रासाठी शपथ देण्यात येणार आहे. या निमित्ताने दि. 31 जानेवारी ते 14 फेब्रुवारी 2024 दरम्यान कुष्ठरोग आणि त्याचबरोबर क्षयरोग जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी अन्य शासकीय विभाग तसेच जनजागृती व लोकसहभागाद्वारे राज्यभर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

कुष्ठरोगाविषयी व्यापक लोकजागृती करण्यासाठी दि. 26 जानेवारी रोजी राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसभा घेण्यात येणार आहेत. या ग्रामसभेमध्ये सरपंच, गावातील प्रतिष्ठित व्यक्ती व कुष्ठबाधित व्यक्ती यांच्या उपस्थितीत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कुष्ठरोगाविषयी जनसामान्यांपर्यंत संदेश पोहचविण्यात येणार आहेत.

नव्या वर्षात संकल्प निरोगी आयुष्याचा

2025 या नव्या कोऱ्या करकरीत वर्षात आपण पदार्पण करत आहोत. नवीन वर्ष साजरे करण्याच्या अनेक देशी विदेशी पद्धती आपल्या समाजात दृढ आहेत. कुणी फिरायला शहर सोडून बाहेर पडतो, कुणी कुटुंबासह दिवस घालवतो, अगदीच हौशी मंडळी मित्रमंडळीसह या दिवसाचे सेलिब्रेशन करतो तर काही नव्या वर्षाचे विविध संकल्प सोडून नववर्षाचे स्वागत करतात. एखादा नवा उद्योगधंदा सुरू करण्याचा पण केला जातो, नवे घर, गाडी विकत घेण्याचा संकल्प किंवा दररोजच्या जीवनात ठराविक गोष्ट खाणे सोडणे, वागणे, बोलणे, चालणे यात बदल करण्याचादेखील संकल्प केला जातो. मात्र माणसाच्या आयुष्यात सर्वात महत्वाची गोष्ट आहे ती म्हणजे त्याचे आरोग्य. आरोग्य व्यवस्थित असेल तर त्याला हव्या त्या गोष्टी मिळवण्यात फारशा अडचणी उदभवत नाहीत त्यामुळेच आपले आरोग्य नीट सांभाळण्याचा संकल्प प्रत्येकाने नव्या वर्षात करायला हवा.

नव्या वर्षाकडून आपल्यापैकी प्रत्येकाला अनेक आशा असतात. अनेक प्रकारची नियोजने केलेली असतात. मात्र, आपले नियोजन तेव्हाच यशस्वी होते, जेव्हा आपण तंदुरुस्त आणि निरोगी राहू. आपले शरीर निरोगी राहावे असे प्रत्येकाला वाटते. त्यासाठी आपण प्रयत्नशील असतो. मात्र आजच्या धकाधकीच्या जीवनात आरोग्य सुदृढ राखण्यासाठी आवश्यक असलेला वेळ आपल्याला मिळत नाही हेदेखील तितकेच खरे आहे. मात्र आरोग्यासाठी प्रत्येकाने दिवसातील थोडा वेळ काढणे गरजेचे आहे अन्यथा जेव्हा वेळ असेल तेव्हा वेळ निघून गेलेली असेल. तुमचं आरोग्य चांगलं असेल तरच तुमचं मानसिक स्वास्थ्य व दैनंदिन जीवनातील आत्मविश्वास देखील चमकदार असतो. म्हणून आरोग्यदायी असणं महत्त्वाचं आहे. यासाठी काही आरोग्यदायी संकल्प आपण आज सोडायलाच हवेत. मानसिक आरोग्य आणि सुंदरता या दोन्ही गोष्टी एकमेकांवर अवलंबून आहेत. राग, ईर्ष्या, गर्व किंवा नकारात्मकता मनात असेल तर ते चेहऱ्यावर प्रतिबिंबीत होते. त्याचबरोबर ताण, तणाव, नैराश्य, चिंता यामुळे चेहरा निस्तेज दिसू लागतो. म्हणून मानसिक स्वास्थ्य चांगले असणे गरजेचे आहे.

नवीन वर्षात मानसिक स्वास्थ्य चांगले राखण्यासाठी सतत प्रयत्नशील रहा. तुम्हाला आनंद देणारी चांगली कामे करा. तुमचे छंद जोपासा. छंद जोपासणे सुरू असेल तर ते टिकवून ठेवा. नवीन ठिकाणी फिरायला जा. त्यामुळे तुमचे मन आनंदी होईल आणि तो आनंद तुमच्या चेहऱ्यावर नक्कीच दिसेल. ध्यान, विश्वास व श्रद्धा या गोष्टीदेखील खूप महत्त्वाच्या आहेत. ईश्वरी ध्यानामुळे तुमचे मन शांत होईल. राग, द्वेष, भीती, चिंता दूर होऊन मानसिक संतुलन साधण्यास मदत होईल. त्यामुळे आपली सकारात्मकता वाढीस लागेल. मनाचे स्वास्थ्य चांगले राखण्यासाठी तुम्हाला सात्विक आहार घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. असं म्हणतात, यथा अन्नम् तथा मनम्. म्हणून फळे, भाज्या, पालेभाज्या, सुकामेवा यांसारख्या सात्विक आहारामुळे तुमचे शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम राहील. परिणामी तुम्ही सजग व आत्मविश्वासाने भरलेले राहाल. म्हणून शक्यतो सात्विक अन्नाचा आहारात समावेश करा. नव्या वर्षात आणखी आपण काय करायला हवे तर नव्या वर्षापासून नवे विचार आपल्या मनात रुजायला हवेत. आपण निश्चय करायला हवेत मग तो निश्चय दररोज चालायला जायचा असो किंवा व्यायाम करायचा, वा वजन कमी करायचा. पण योग्य विचारांना नियोजनांची साथ मिळाली नाही तर त्या संकल्पांना काही अर्थ राहणार नाही. तुमचेच संकल्प काही दिवसांतच

तुमच्याकडूनच मोडीत निघाल्याशिवाय राहणार नाहीत. नेहमी फार मोठे टारगेट ठेवले जाते. उदाहरणार्थ, मी एका महिन्यात 10 किलो वजन कमी करेन. वास्तविकपणे व नैसर्गिकपणे हे नक्कीच शक्य नाही. त्यापेक्षा मी नियमित व्यायाम करून आणि योग्य आहार घेउन शारिरिक स्वास्थासाठी मनापासून प्रयत्न करीन हा निश्चय जास्त योग्य आहे. असे केल्यामुळेच आपण आपल्या ध्येयाकडे वाटचाल करू शकतो.

एक वाईट गोष्ट सोडण्याचा निश्चय पूर्ण करणे अवघड आहे. पण त्या तुलनेत चांगले काम करण्याचा निश्चय पाळणे सोपे आहे. त्यासाठी संकल्पांमध्येही ताळमेळ हवा. ते संकल्प जास्त यशस्वी होतात. संकल्प पाळण्यात अपयश आले तर लगेचच तो सोडून देणे योग्य नसून पुन्हा पुन्हा प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसे बघितले तर प्रत्येक दिवस नवाच असतो. 1 जानेवारीला तुमचा जेवण कमी करण्याचा संकल्प पाळला गेला नाही तर 2 तारखेला तो परत सुरु करा. वाटेतच सोडून देऊ नका. उद्यावर ढकलण्याचे कामही करू नका. संकल्पात सातत्य असणे जितके महत्वाचे आहे तितकेच तो टिकवण्यात परिश्रम व जिद्ददेखिल अत्यंत महत्वाची आहे. त्यामुळे नववर्षाचे आगमन आपल्याला नवीन संकल्पांसाठी चांगली संधी आहे आणि आपले संकल्प आपल्या आरोग्याच्या दृष्टीने उपयुक्त असायला हवेत.

नव वर्षाच्या सर्वांना आरोग्यदायी शुभेच्छा.

वैभव मोहन पाटील
कक्ष अधिकारी

आरोग्यदायी आहार घ्या, निरोगी रहा...

निसर्गाशी एकरूप रहा, निरोगी मार्ग स्वीकारा

- शरीराचा आकार संतुलित ठेवा
- हळू हळू खा व व्यवस्थिपणे चावून खा
- जंक फूडचे सेवन करु नये
- प्रथिनयुक्त पदार्थांचा आहारामध्ये समावेश करा, जसे की दूध, पनीर ,डाळी, मांसाहार इ.
- आहारामध्ये पालेभाज्यांचा अधिक समावेश करा
- आपल्या आहारामध्ये वेगवेगळ्या पालेभाज्या, फळे, फळभाज्या, कडधान्य इ .गोष्टींचा समावेश करा

निरोगी सवय... निरोगी जीवन... निरोगी भारत !

निरोगी जीवन हीच धनसंपत्ती

मुलींच्या जन्माकडे सकारात्मकतेने बघा

समतोल आणि न्याय्य समाजासाठी मुलामुलींचे प्रमाण समान असणे आवश्यक आहे. निसर्ग नियमानुसार सुद्धा ते समान असले पाहिजे, घटते बाल लिंग गुणोत्तर ही एक सामाजिक समस्या आहे. या समस्येला सामोरे जाण्यासाठी सर्वस्तरातील जनतेने एकत्रित प्रयत्न करणे महत्वाचे आहे. सन 2024 च्या प्राप्त माहिती नुसार छत्रपती संभाजीनगर जिल्हयात जन्मतः 1000 मुलांमागे 889 मुली असे प्रमाण आहे. यामध्ये सुधारणा करण्यासाठों गेली अनेक वर्षे शासनस्तरावर खालीलप्रमाणे विविध उपायोजना करण्यात येत आहेत. खरं म्हणजे मुलगा असो वा मुलगी जन्म ही एक आनंददायी घटना असते. जीवन हे नेहमीच प्रवाही असते. त्याप्रवाहाला जीवंत ठेवणारी स्त्री असते. म्हणून मुलीच्या जन्माकडे बघण्याची समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाने विविध पात्तळीवर प्रयत्न चालविले आहेत, त्याचाच हा एक आढावा, शासकीय यंत्रणेकडून पीसीपीएनडीटी कायद्याची यथायोग्य अंमलबजावणी करण्यात येते तसेच बेकायदेशीर गर्भपात करणाऱ्या संस्थांवर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या संवेदीकरण कार्यशाळा घेऊन त्यांना मुलींच्या जन्माचे महत्त्व पटवून देण्यात येत आहे. जिल्हयातील क्ष-किरण तज्ञ आणि स्त्री रोग व प्रसूती शास्त्र तज्ञ यांची 1994 च्या पीसीपी एन टी कायद्याबाचत तालुकास्तरावर संवेदीकरण कार्यशाव्य घेऊन मुलीच्या जन्मामध्ये बाढ होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. सन 2015 पासून 'सुकन्या समृद्धी योजना' सुरू करण्यात आली आहे. मुलीच्या सामाजिक तसेच आर्थिक जीवनात सुधारणा करणे व त्यांचा शैक्षणिक विकास करून त्यांना भविष्यात सशक्त व आत्मनिर्भर बनवण्याच्या उद्देशाने या योजनेअंतर्गत एकाच परिवारातील तीन मुली लाभ घेऊ शकतात. या योजनेअंतर्गत दरवर्षी किमान 250 रुपये पासून कमाल दीड लाख रुपये गुंतवणूक करून या योजनेचा लाभ घेता येतो. मुलीच्या वयाच्या 15 वर्षापर्यंत रक्कम भरावी लागते. त्यानंतर 21 वर्षापर्यंत रक्कम भरण्याची गरज नाही. जमा रकमेवर कोणताही कर भरावा लागत नाही. 29 वर्षानंतर रक्कम काढली नाही तरी ब्याज सुरू राहते.

लाभार्थीचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास जमा रक्कम व्याजासह लाभार्थीच्या पालकांना दिली जाते, सन 2016 पासून महाराष्ट्र शासनाने मुलीसाठी 'माझी कन्या भाग्यश्री' योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत मुलीच्या जन्माच्या वेळी पालकांना 50 हजार रुपये मिळतात तसेच अपघात विमा संरक्षण ही आहे. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाखापेक्षा कमी आहे व एका मुलीच्या जन्मानंतर एका वर्षाच्या आत पालकांनी कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया केली तर 50 हजार रुपये दिले जातात. दोन मुलींसाठी दोन्ही मुलींच्या नावावर 25-25 हजार रुपये दिले जातात. सन 2017 पासून 'प्रधानमंत्री मातृ बंदना योजना' या योजनेअंतर्गत पहिल्यांदा गरोदर असल्यास 5 हजार रुपये आणि दुसऱ्या गरोदरपणानंतर अपत्य मुलगी असेल तर रु 6 हजार रुपये देण्यात येतात. दि. 1 एप्रिल 2023 नंतर जन्मणारया एक अथवा दोन मुलींना (एक मुलगा व एक मुलगी असल्यास फक्त मुलाला) पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक / कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपये पेक्षा कमी असणाऱ्या कुटुंबात मुलीचा जन्म झाल्यावर रु5 हजार रुपये इयत्ता पहिलीत गेल्याबर 6 हजार रुपये, इ. सहावीत गेल्यावर 7

हजार रुपये, इयत्ता 11 बीत गेल्यावर8 हजार रुपये व वयाची 18 वर्षे पूर्ण झाल्यावर 75 हजार रुपये, अशा रितीने त्या मुलीस एकूण 1 लाख 1 हजार रुपये एवढा लाभ महाराष्ट्र शासनाच्या 'लेक लाडकी' या योजनेअंतर्गत मिळेल, सर्वसामान्य जनतेमध्ये प्रसिद्धी व जनजागृती करण्यासाठी सामाजिक दृष्टया या महत्वाच्या कार्यामध्ये खाजगी रुग्णालये / डॉक्टरांनी सक्रिय सहभागी होणे आवश्यक आहे. त्यासाठी महत्वाच्या खालील किमान 5 बाबी खाजगी रुग्णालये डॉक्टरांनी अंमलात आणाव्यात.

1. जन्म झालेल्या मुलीच्या पालकांना वरील सर्व शासकीय योजनांची माहिती देण्यात यावी. त्याचा प्रसिद्धी फलक आंतर रुग्ण विभागामध्ये दर्शनी ठिकाणी लावण्यात यावा.
2. आपल्या रुग्णालयात मुलीचा जन्म झाल्यावर त्या पालकांचे अभिनंदन सत्कार करावा.
3. आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येक गरोदर मातेस गर्भ लिंग निदान करू नये यासाठी समुपदेशन करावे.
4. मुलीच्या जन्माची सुखद आठवण म्हणून रुग्णालयाकडून त्यांना एखादी भेटवस्तू देण्यात यावी.
5. रुग्णालयाचे संपूर्ण बिल माफ करावे किंवा किमान 50% सवलत देऊन मुलीच्या जन्माचे स्वागत करावे,

जानेवारी ते डिसेंबर 2024 अखेर तालुकानिहाय जन्मतः लिंग प्रमाणाची आकडेवारी अभ्यासता छत्रपती संभाजीनगर, फुलंब्री व सोयगाव तालुका वगळता इतर सर्व तालुक्यांमधे जन्मतः लिंग प्रमाण 900 पेक्षा कमी आहे. मुलीच्या घटत्या प्रमाणाची किंमत संपूर्ण समाजासह आपल्या सर्वांनाच चुकवावी लागेल, त्यापासून वाचायचे असेल तर शासनासोत्त जनता व खाजगी रुग्णालये डॉक्टर इ. समाजातील सर्व घटकांना पुढे यावे लागेल. आपण या पवित्र कार्यात प्रत्येकाने आपला सक्रिय सहभाग नोंदवून जन्मतः लिंग प्रमाणांमध्ये वाढ होईल यादृष्टीने प्रयत्न करावेत, त्यासाठी समाजाची मानसिकता बदलविणे आवश्यक आहे.

डॉ. अभय धानोरकर,
जिल्हा आरोग्य अधिकारी,
छत्रपती संभाजीनगर

सन 2024 मधील तालुकानिहाय जन्मतः लिंग प्रमाण

अ. क्र.	तालुका	एकूण जन्म नोंदणी			लिंग गुणोत्तर	रँक
		पुरुष	स्त्री	एकूण		
1	छत्रपती संभाजीनगर	22135	20089	42224	908	2
2	कन्नड	1702	1425	3127	837	8
3	सोयगाव	304	279	583	918	1
4	सिल्लोड	3464	2916	6380	842	7
5	फुलंब्री	304	274	578	901	3
6	खुलताबाद	487	410	897	842	6
7	वैजापूर	1461	1258	2719	861	5
8	गंगापूर	1126	993	2119	882	4
9	पैठण	1316	1081	2397	821	9
	एकूण	**32299**	**28725**	**61024**	**889**	**----**

राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रम "100 दिवस मोहीम"

मा.पंतप्रधान महोदयांनी सन 2025 पर्यंत देशातून क्षयरोग दुरिकरण करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवलेले आहे. क्षयरोग दुरिकरणाचे हे निर्धारित केलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकारकडून युद्ध पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. त्यानुषंगाने देशात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून देशातील निवडक 347 जिल्ह्यांमध्ये दिनांक 07 डिसेंबर 2024 ते दिनांक 24 मार्च 2025 दरम्यान "100 दिवस मोहीम" राबविण्यात येत आहे. या मोहिमेमध्ये राज्यातील क्षयरोगाचा अधिक प्रभाव असलेल्या 17 ग्रामीण जिल्हे व 13 महानगरपालिका कार्यक्षेत्राचा समावेश केंद्रिय क्षयरोग विभागाद्वारे करण्यात आलेला आहे.

मोहिमेसाठी राज्यातील जिल्हे

- 17 ग्रामीण जिल्हे:- अहिल्यानगर, भंडारा, चंद्रपुर, गडचिरोली, गोंदिया, कोल्हापूर, लातूर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, परभणी, रायगड, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, वाशिम व यवतमाळ.

- 13 महानगरपालिका:- बृहन्मुंबई मनपा, अहिल्यानगर मनपा, अमरात्ती मनपा, धुळे मनपा, जळगाव मनपा, कोल्हापूर मनपा, मालेगाव मनपा, नागपुर मनपा, नांदेड-वाघाळा मनपा, ठाणे मनपा पिंपरी-चिंचवड मनपा, सोलापूर मनपा व उल्हासनगर मनपा.

केंद्रिय क्षयरोग विभाग, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकारकडील मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यस्तरावरून संबंधित जिल्हे व महानगरपालिकांना पत्राव्दारे सर्व मार्गदर्शक सूचना पाठविण्यात आलेल्या आहेत. तसेच संबंधीत जिल्हयांचे जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त यांचे तसेच सर्व वरिष्ठ जिल्हास्तरीय अधिकारी यांचे विविध व्हीसीद्वारे केंद्रातून व राज्य स्तरावरून संवेदीकरण करण्यात आलेले आहे.

मोहिमेची उद्दिष्टे

- जास्तीत जास्त क्षयरोग रुग्ण वेळेत शोधुन उपचाराखाली आणणे.
- क्षयरोगाचा मृत्यू दर कमी करणे.
- क्षयरोगचा प्रसार कमी करून नवीन क्षयरुग्ण टाळणे.

मोहिमेदरम्यान करण्यात येत असलेली कार्यवाही

- क्षयरोगाचा प्रादुर्भाव जास्त असलेल्या भागांचे मॅपिंग (High Risk mapping) संबंधीत जिल्हा/मनपा स्तरावरून करण्यात आलेले असून त्यामध्ये 60 वर्षावरील व्यक्ति, मागील 5 वर्षातील क्षयरोग बाधित रुग्ण, क्षयरुग्णांच्या संपर्कातील व्यक्ति, धूम्रपान करणारे व्यक्ति, मधुमेह व एचआयव्ही बाधित व्यक्ति, कुपोषित व्यक्ति व इतर जोखीमग्रस्त गट असलेल्या भागातील व्यक्तींची आणि झोपडपट्टी, कारागृह, वृद्धाश्रम, आश्रमशाळा, जोखीमग्रस्त भागातील औद्योगिक कार्यक्षेत्रे इ. ठिकाणच्या व्यक्तींची या मोहिमेदरम्यान क्षयरोगासाठी तपासणी करण्यात येत आहे.

- राज्यातील 17 ग्रामीण जिल्हे व 13 महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अंदाजित 1.37 कोटी लोकसंख्येचे क्षयरोग तपासणीसाठी मॅपिंग करण्यात आलेले आहे. सदर मॅप करण्यात आलेल्या लोकसंख्येपैकी अतिजोखमीच्या सर्व लोकांची छातीचा एक्स-रे काढून तपासणी करण्यात येत आहे तसेच उर्वरित लोकसंख्येपैकी संशयित क्षयरुग्ण म्हणून शोधलेल्या लोकांची छातीच्या एक्स-रे द्वारे व त्यांच्या बेडका नमुन्याची नॅट मशिनद्वारे आणि सूक्ष्मदर्शकाद्वारे क्षयरोग निदानासाठी चाचणी करण्यात येत आहे.

- सदर मोहिमेदरम्यान क्षयरोगाचे निदान झालेल्या व्यक्तींना त्वरित उपचारखाली आणण्यात येत आहे व त्यांचा पाठपुरावा करून संनियंत्रण करण्यात येत आहे.

- मोहिमेदरम्यान निदान झालेल्या क्षयरुग्णांसाठी निक्षय मित्र बनवून त्यांच्यामार्फत क्षयरुग्णांना ड्राय फूड बास्केट उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

- उपचाराखाली आणलेल्या सर्व क्षयरुग्णांना शासनाच्या निक्षय पोषण योजनेचा लाभ देण्याची कार्यवाहीही सुरु आहे.

- क्षयरोग निदान झालेल्या व्यक्तींची पूर्ण वैद्यकीय तपासणी (Clinical Assessment) करून त्यानुसार योग्य त्या उपचार प्रणालीचा (Differentiated TB Care Approach) अवलंब करण्यात येत आहे.

- तसेच क्षयरोग नसलेल्या परंतु क्षयरुग्णाच्या संपर्कात असलेल्या किंवा इतर पात्र लोकांना मार्गदर्शक सूचनेनुसार क्षयरोग प्रतिबंध उपचार प्रणाली (T B Preventive Therapy) देण्यात येत आहे.

- तसेच केंद्रिय क्षयरोग विभागाकडील मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यामध्ये 56 निक्षय वाहने मोहिमेसाठी तयार जिल्हा व मनपा स्तरावर तयार करण्यात आली असून त्याद्वारे मोहिमेची प्रचार प्रसिद्धी व जनजागृती करण्यात येत आहे. तसेच निक्षय वाहनातील एक्स-रे मशिनद्वारे छातीची एक्स-रे तपासणी व NAAT मशिनद्वारे बेडका नमूना तपासणी कार्यक्षेत्रातही करण्यात येत आहे.

क्षयरोग तपासणी सेवा

राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमातंर्गत क्षयरोग तपासणी सेवा मोफत पुरविल्या जातात व मार्गदर्शक सुचननेनुसार क्षयरोगाचे निदान करण्यात येते. क्षयरोग निदानासाठी तपासणी सेवा मध्ये छातीचा एक्स-रे, बेडका नमुन्याची नॅट मशिनद्वारे व सूक्ष्मदर्शकाद्वारे तपासणी आणि गरजेनुसार एलपीए तपासणी या सेवांचा समावेश आहे. तसेच नवीन निदान झालेल्या क्षयरुग्णांमधील औषधांची संवेदनशीलता तपासण्याकरिता CBNAAT व Truenat मशीनमुळे सोय झालेली आहे.

राज्यामध्ये 624 Truenat व 171 CBNAAT मशिन्स असून ग्रामीण भागातही प्रत्येक तालुकास्तरावर नॅट मशिन्सद्वारे तपासणीची सुविधा उपलब्ध आहे. Nikshay डिजीटल प्लॅटफॉर्ममुळे क्षयरोगाची नोंदणी, लागाणारा सल्ला व सेवा अधिक सूलभ झाल्या आहेत.

समाजातील क्षयरोगासाठी अतिजोखमीच्या गटांसाठी जसे की, बालके, वृध्द, एचआयव्ही बाधित रुग्ण व आदिवासी समुदायासाठी विशेष सेवा, सल्ला व उपचार दिले जातात. तसेच सर्व एचआयव्ही बाधित व्यक्तिंमध्ये क्षयरोगाची वेळीच चाचणी तसेच सर्व क्षयरुग्णांची एचआयव्हीसाठीची चाचणीही करण्यात येते.

क्षयरुग्णांना औषधोपचार

राष्ट्रीय क्षयरोग दूरिकरण कार्यक्रमांतर्गत क्षयरुग्णांना त्यांच्या वजनानुसार उत्तम दर्जाचे क्षयरोग विरोधी औषधे (Fix Dose Combination मध्ये) उपचार पूर्ण होईपर्यंत अखंडित्त मोफत पुरविण्यात येतात. क्षयरोग पथकामधील (Tuberculosis Unit-TU) वैद्यकिय अधिकारी यांच्यामार्फत क्षयरुग्णांचे उपचार पूर्ण होण्याकरिता सतत पाठपुरावा व देखरेख करण्यात येते. औषधांना दाद न देणाऱ्या (Multi Drug Resistant-MDR व Extensively Drug Resistant-XDR) क्षयरोगाच्या रुग्णांसाठी विशेष औषधोपचार योजना देखील उपलब्ध आहे. केंद्रिय क्षयरोग विभागाकडील मार्गदर्शक सूचनेनुसार MDR व XDR क्षयरुग्णांना योग्य ते औषधोपचार मोफत सुरु करण्यात येतात.

क्षयरोगविरोधी औषधांना दाद न देणाऱ्या क्षयरोगावर उपचार करण्यासाठी नवनवीन औषधांचा विकास होत आहे. क्षयरोगाचे दुरिकरण करण्यासाठी आत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अधिक परिणामकारक ठरत आहे.

सदर मोहिमेच्या अनुषंगाने दिनांक 07 डिसेंबर 2024 ते दिनांक 24 मार्च 2025 दरम्यान जिल्हा, तालुका, आरोग्य संस्था स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांचा आराखडा संबंधित जिल्हा/मनपा स्तरावर तयार करण्यात आलेला असून मोहिमेच्या मार्गदर्शक सूचना राज्यस्तरावरून संबंधित जिल्हा/मनपा यांना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत व त्यानुसार जिल्हा/मनपा स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

दिनांक 07 डिसेंबर 2024 ते दिनांक 24 मार्च 2025 दरम्यानच्या या 100 दिवशीय क्षयरोग मोहीमेचा राज्यस्तरीय शुभारंभ मा.ना.श्री. प्रतापराव जाधव, राज्यमंत्री, आयुष (स्वतंत्र कारभार) आणि आरोग्य व कुटुंब कल्याण, भारत सरकार यांच्या शुभ हस्ते वाशिम येथे दिनांक 07 डिसेंबर 2024 करण्यात आलेला आहे. तसेच मोहिमेतील इतर जिल्हे व मनपांनी जिल्हा/मनपा स्तरीय शुभारंभ दिनांक 07 डिसेंबर 2024 रोजी जिल्हा/मनपा स्तरावर केलेला आहे.

दिनांक 07 डिसेंबर 2024 ते दिनांक 24 मार्च 2025 दरम्यानची ही 100 दिवशीय क्षयरोग मोहीम लोक सहभागावर (Community Participation वर) आधारित असून सर्व 17 ग्रामीण जिल्हे व 13 महानगरपालिकेतील उपरोक्त नमूद कार्यक्षेत्रातील नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन ही मोहीम यशस्वी करावी असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

जागतिक युनानी दिवस

जागतिक युनानी दिवस हा दिनांक ११ फेब्रुवारी रोजी युनानी दिवस म्हणून साजरा केला जातो कारण युनानी वैद्यकीय पद्धतीचे महान अभ्यासक, हकीम अजमल खान यांची जयंती दिन म्हणून साजरा केला जातो. हकीम अजमल खान यांना मसिहा-ए-हिंद, मसीह-उल-मुल्क (राष्ट्राचा उपचार करणारा) ही पदवी बहाल करण्यात आली होती कारण त्यांनी व त्यांच्या कुटुंबाने युनानी क्षेत्रातील संशोधन आणि सरावाचा विस्तार केला आणि युनानी औषध पद्धतीला भारतातून नामशेष होण्यापासून वाचवले. या क्षेत्रातील त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे ब्रिटीश राजवटीखालील युनानी वैद्यकीय व्यवस्थेत एक नवीन शक्ती आणि जीवन निर्माण झाले युनानी औषधांच्या स्थानिक पद्धतीचा विस्तार आणि विकास करण्यात त्यांनी खूप रस घेतला आणि त्यासाठी दिल्लीतील सेंट्रल कॉलेज, हिंदुस्थानी दवाखाना आणि आयुर्वेदिक आणि युनानी टिब्बिया कॉलेज दिल्ली तसेच जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठाचे पहिले कुलपती होते. त्यांच्या कुटुंबाचे ब्रीदवाक्य हे_अझल-उल-अल्लाह-खुदतुलमल आहे , ज्याचा अर्थ असा आहे की स्वतःला व्यस्त ठेवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे मानवतेची सेवा करणे. त्यांचे सर्व कुटुंब व त्यांच्या युनानी वैद्यकीय क्षेत्रातील योगदान लक्षात घेऊन भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या अंतर्गत केंद्रीय युनानी औषध संशोधन परिषदेने या प्राचीन वैद्यकीय पद्धतीबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी हकीम अजमल खान यांचा जन्मदिवस ११ फेब्रुवारी रोजी युनानी दिवस साजरा करण्याचे ठरवले

जिल्हा रुग्णालय वाशिम या ठिकाणी आयुष विभागाअंतर्गत ही उपचार पद्धती चालू आहे. अनेक रुग्ण या सेवेचा लाभ घेत आहेत , उपचाराची ही पद्धत अनेक लोकांना माहित नाही.

आज आपण या प्राचीन युनानी पद्धतीबद्दल अधिक माहिती जाणून घेऊया:

हदरत नोहचे तीन पुत्र (हॅम, शाम आणि याफास) या पैकी याफास (जाफेथच्या) मुलाचे नाव उनान होते आणि तो राहण्यासाठी प्राचीन ग्रीसला गेला. आणि त्याच्या नावावरून प्राचीन ग्रीसला 'उनान' असे नाव पडले.

युनान हे वैद्यकीय शास्त्राचे उगमस्थान आहे. प्राचीन ग्रीसचा एक महान चिकित्सक एस्क्लेपियस होता. प्राचीन ग्रीसमध्ये त्याला देवता म्हणून गौरवण्यात आले. याच एस्क्लेपियसचे 19 वे वंशज हिप्पोक्रेट्स होते. ज्यांना 'वैद्यकशास्त्राचे जनक' मानले जाते. त्यांनी वैद्यकीय विज्ञानाला अंधारातून बाहेर काढले आणि ते सर्वांसाठी व्यापक केले. त्यांनी एक शपथ स्थापन केली जी 'हिप्पोक्रॅटिक शपथ' म्हणून ओळखली जाते ,जेव्हा इस्लाम सिरिया, पर्शिया इ. मध्ये पसरला; अनेक डॉक्टरांनी इस्लाम धर्म स्वीकारला आणि युनानी औषध मुस्लिमांमध्ये परिचित झाले आणि त्या वेळी अनेक युनानी पुस्तकांचे अरबी, पर्शियन इत्यादी भाषेत भाषांतर झाले. त्यामुळे महान वैद्य जकारिया अल रझी, इब्न सिना, अबुल कासीम जहरावी यांचे आगमन झाले. तेव्हापासून युनानी वैद्यकशास्त्राला 'इस्लामिक वैद्यकशास्त्रा'ची ओळख झाली. युनानी वैद्यकशास्त्रातील ज्ञान प्राप्त केलेल्या व्यक्तीला 'हकीम' असे म्हणतात. म्हणून त्याला 'हकीमी शास्त्र' असेही म्हणतात.

युनानी वैद्यकीय पद्धतीची सुरुवात ग्रीसच्या उनान प्रांत (सध्याचे ग्रीस) हिप्पोक्रेट्सने केली. ही वैद्यकीय व्यवस्था दहाव्या शतकात अरब आणि पर्शियन लोकांनी भारतात आणली

ऐतिहासिक पार्श्वभूमी

आयुर्वेद प्रमाणेच ही युनानी औषध पद्धती भारतात 10 व्या शतकाच्या आसपास पर्शियन विद्वानांनी आणली आणि ते उपखंडातील वैद्यकीय सरावाचा एक आवश्यक भाग बनले, हिप्पोक्रेट्स यांच्या कार्यांनी प्रेरित होउन गॅलेन यांनी वैद्यकीय प्रणालीमध्ये याचा विस्तार केला. त्यासोबत इस्लामिक सुवर्णयुगात या प्रणालीची भरभराट झाली, इब्न सिना (अविसेना) सारख्या विद्वानांनी तिच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

मूलभूत तत्त्वे

युनानी औषध चार तत्वाच्या संतुलनावर आधारित आहे. यामध्ये :-

1) रक्त (धरण),
2) कफ (बलघम),
3) पिवळे पित्त (सफ्रा),
4) काळे पित्त (सौदा)

जेव्हा यामध्ये असंतुलन निर्माण होते तेव्हा रोग निर्माण होतो असे मानले जाते. आपले शरीर हे पंच तत्वांनी बनलेल असते. यामध्ये खालील चार घटक प्रमुख मानले जातात:-चार घटक

1) पृथ्वी,
2) पाणी,
3) आग,
4) हवा

हे घटक चार तत्वाशी सुसंगत आहेत आणि युनानी वैद्यकशास्त्रातील मानवी आकलनासाठी अविभाज्य आहेत.

सराव आणि उपचार निदान

- नाडी निदान : विनोदांचे संतुलन समजून घेण्याची पद्धत.
- लघवीची तपासणी : शरीराच्या कार्याची अंतर्दृष्टी प्रदान करते.

उपचारात्मक दृष्टीकोन

- आहाराचे नियम : विनोद संतुलित करण्यासाठी आहार तयार करणे.
- हर्बल औषधे : बरे होण्यासाठी हर्बल मिश्रणाचा वापर.
- सर्जिकल प्रक्रिया : काही प्रकरणांमध्ये, शस्त्रक्रिया हस्तक्षेप लागू केला जाऊ शकतो.
- युनानीचा जागतिक प्रभाव आणि अनुकूलन
- युनानीने विविध संस्कृतींमध्ये अमिट छाप सोडली आहे:
- मध्य पूर्व : इराणसारख्या देशांमध्ये सराव सुरू आहे.
- दक्षिण आशिया : भारत, पाकिस्तान आणि बांगलादेशमधील वैद्यकीय पद्धतींचा अविभाज्य भाग.
- पाश्चात्य प्रभाव : काही पाश्चात्य समग्र उपचार पद्धतींमध्ये अनुकूलन.

युनानी औषध कशासाठी वापरली जातात

रक्त, कफ, पिवळे पित्त आणि काळे पित्त: शरीरातील हे चार विनोद संतुलित करून विविध रोग आणि परिस्थितींवर उपचार करण्यासाठी युनानी औषध वापरले जाते. हे हर्बल उपचार, आहार पद्धती आणि व्यायाम यासारख्या नैसर्गिक उपचारांवर अवलंबून आहे, रुग्णाच्या घटनेवर जोर देते.

आयुर्वेद आणि युनानी एकच आहे का?

नाही; आयुर्वेद ही भारतीय पद्धती आहे आणि युनानी ही ग्रीक पद्धती आहे. हे एकसारखे नाहीत, पर्शियन विद्वानांनी ही वैद्यकीय पद्धतीं भारतात आणली. भारतीय उपचार पद्धतीचा समग्र अविभाज्य भाग बनली. आयुर्वेद हा पाच घटकांच्या सिद्धांतावर आधारित आहे, तर युनानी ग्रीक तत्त्वज्ञानावर आधारित आहे, जी शरीराच्या चार विनोदांवर लक्ष केंद्रित करते.

युनानी आरोग्यासाठी चांगली आहे का?

युनानी हे आरोग्यासाठी चांगले मानले जाते. कारण ते प्रतिबंधावर भर देते आणि नैसर्गिक उपायांसह रोगांवर



उपचार करते. हे शरीरातील संतुलनास प्रोत्साहन देते आणि व्यक्तीच्या विशिष्ट घटनेवर लक्ष केंद्रित करते

युनानी आणि होमिओपॅथीमध्ये काय फरक आहे?

युनानी औषध शरीराच्या चार विनोदांना संतुलित ठेवण्यावर भर देते, तर होमिओपॅथी आजारांवर "लाइक क्युअर लाइक" द्वारे रोगाचा उपचार करते, ज्यामुळे रोगासारखीच लक्षणे दिसून येतात. तत्त्वज्ञान आणि आचरण वेगळे आहेत

युनानी आणि हर्बल औषधांमध्ये काय फरक आहे?

युनानी आणि हर्बल औषधांमधील फरक असा आहे की, युनानी जीवनशैलीतील बदल आणि आहारविषयक मार्गदर्शक तत्त्वे समाविष्ट करून एक समग्र दृष्टीकोन वापरते, तर हर्बल औषध प्रामुख्याने उपचारांसाठी वनस्पती आणि औषधी वनस्पती वापरण्यावर लक्ष केंद्रित करते.

युनानी कोणत्या प्रकारचे औषध आहे?

युनानी हे एक प्रकारचे समग्र औषध आहे जे व्यक्तीच्या घटनेवर जोर देते आणि हर्बल उपचार, आहार आणि व्यायामासह नैसर्गिक उपचारांद्वारे शरीराच्या चार विनोदांना संतुलित करते.

युनानी आणि सिद्ध म्हणजे काय?

युनानी आणि सिद्ध या दोन वेगळ्या पारंपारिक उपचार पद्धती आहेत. युनानीचा पाया ग्रीक तत्त्वज्ञानात आहे, तर सिद्धाचा उगम दक्षिण भारतातून झाला आहे, जो विशिष्ट अल्केमिकल तयारी आणि पंच-तत्त्वांच्या सिद्धांतावर आधारित अद्वितीय उपचारांचा वापर करून केला जातो

युनानीचे महत्वाचे 7 घटक

युनानीचे सात घटक आहेत: उमूर तबिया (मूलभूत शारीरिक तत्त्वे), असबाब (कारक घटक), अलमत (चिन्हे आणि लक्षणे), अखलत (विनोद), आझा (अवयव), अरवाह (महत्वाचा आत्मा), आणि मिजाज (स्वभाव).

युनानीमध्ये जीवनासाठी आवश्यक असलेल्या सहा गोष्टी युनानीमध्ये जीवनाच्या सहा आवश्यक गोष्टी आहेत:

हवा, अन्न आणि पेय, शारीरिक हालचाल आणि आराम, मानसिक हालचाल आणि विश्रांती, झोप आणि जागरण आणि धारणा आणि बाहेर काढणे. हे शरीरातील आरोग्य आणि संतुलन राखण्यासाठी पायाभूत मानले जाते

युनानी वैद्यकीय शास्त्रात मानवी शरीरात 7 गोष्टी महत्वाच्या असतात.

'अर्कन' किंवा मूलभूत घटक.

युनानी वैद्यकशास्त्र सांगते की, मानवी शरीरात अग्नि, वायू, पाणी आणि पृथ्वी या चार मूलभूत घटकांचा समावेश होतो. येथे आग म्हणजे फॉस्फरस, फ्लोरिन, क्लोरीन, ऑक्सिजन या घटकांप्रमाणे अग्नि; पाणी म्हणजे हायड्रोजनसारख्या घटकांसारखे पाणी; हवा म्हणजे हवा म्हणजे नायट्रोजन, पृथ्वी म्हणजे पृथ्वी म्हणजे कार्बन, सल्फर, सोडियम, पोटॅशियम इत्यादी घटक. मुळात मानवी शरीर या 4 मूलभूत घटकांच्या गुणोत्तराने बनलेले आहे.

'मिजाज' किंवा स्वभाव.

मानवी शरीरात जेव्हा हे चार मूलभूत घटक एका विशिष्ट प्रमाणात राहतात तेव्हा एक विशिष्ट मिजाज किंवा स्वभाव तयार होतो. प्रत्येक मूलभूत घटकाचा विशिष्ट 'मिजाज' किंवा स्वभाव असतो उदा. अग्नीचा स्वभाव उष्ण आणि कोरडा असतो, पाण्याचा स्वभाव थंड आणि ओलसर असतो, पृथ्वीचा स्वभाव थंड आणि कोरडा असतो, हवेचा स्वभाव उष्ण आणि आर्द्र असतो. जेव्हा हे 4 मूलभूत घटक समान प्रमाणात राहतात, तेव्हा मानवी शरीर स्थिर स्थितीत राहते; परंतु जेव्हा या 4 मूलभूत घटकांच्या गुणोत्तरामध्ये बदल होतो तेव्हा मानवी शरीर आजारी पडते.

'अखलत' किंवा विनोद.

युनानीमध्ये असे मानले जाते की मानवी शरीरात चार प्रकारचे विनोद आहेतः-

1) 'दाम' किंवा रक्त,'

2) बलघम' किंवा कफ,

3) 'सफ्रा' किंवा पिवळे पित्त,

4) 'सौदा' किंवा काळे पित्त. युनानी वैद्यकशास्त्रानुसार, जेव्हा शरीरातील विनोदांमध्ये असंतुलन निर्माण होते, तेव्हा शरीरावर रोगाचा हल्ला होण्याची शक्यता असते.

'आझा' किंवा अवयव

अंतर्गत अवयव आणि बाह्य अवयव).

'अरवाह' किंवा प्राणशक्ती.

रुहे हयवानी (महत्वाचा न्यूमा), रुहे नफसानी (मानसिक न्यूमा), रुहे तबयी (नैसर्गिक न्यूमा).

'क्वा' किंवा शक्ती.

कुवत-ए-हयवानिया (महत्वाची शक्ती), कुवत-ए-नफसानिया (मानसिक शक्ती) आणि कुवत-ए- तबिय्याह (नैसर्गिक शक्ती).

'अफल' किंवा कृती.

मुळात, युनानी वैद्यकीय शास्त्रात असे म्हटले जाते की, जेव्हा विनोदाचा समतोल बदलतो, तेव्हा मानवी शरीरावर रोगाचा हल्ला होतो आणि या स्थितीवर मात करण्यासाठी उपचार प्रक्रिया 3 चरणांनी केली जाते.

1) रोगाचे पहिले कारण शोधणे आणि ते दूर केले जातात.

2) नंतर विनोदांचा समतोल परत आणला जातो.

3) शेवटी टॉनिक औषधे देऊन रोगग्रस्त अवयवाची स्थिती सुधारली जाते.

युनानी उपचारात 3 पायऱ्या असतात.

1) 'इलाज बिल गिझा' (अन्नाद्वारे उपचार)

या प्रक्रियेमध्ये रुग्णाला कोणते अन्न आवश्यक आहे आणि कोणते अन्न टाळावे असा सल्ला दिला जातो. एक उदाहरण म्हणून, ज्या रुग्णाने डोकेदुखीचा हल्ला केला त्याला गॅस तयार करणारे अन्न खाण्यास मनाई आहे. असे म्हटले जाते की वायू मेंदूवर चढतो आणि मेंदूच्या नसांवर दबाव निर्माण करतो, त्यामुळे ऑक्सिजनचा पुरवठा अडथळा येतो आणि डोकेदुखीचा त्रास होतो. त्याचप्रमाणे, तापाच्या रुग्णाला हलके अन्न खाण्याचा सल्ला दिला जातो.

2) 'इलाज बिल दावा (औषधाने उपचार)

युनानीमध्ये दोन प्रकारचे औषध आहे: मुफ्रद दावा (एकच उपाय) आणि मुरक्कब दावा (संमिश्र उपाय). एकाच उपायामध्ये, रुग्णाला एकच औषधी वनस्पती घेण्याचा सल्ला दिला जातो (उदा. फक्त आवळा घ्या). मिश्रित उपायामध्ये, रुग्णाला मिश्रित औषधे (टॅब्लेट, सिरप, पावडर, अर्ध-घन मिश्रण इ.) घेण्याचा सल्ला दिला जातो.

3) 'इलाज बिल तदबीर' (रेजिमेंटल थेरपी)

या पद्धतीमध्ये रुग्णाला कोणतेही अन्न किंवा औषध दिले जात नाही, परंतु शरीराचा समतोल दुसऱ्या प्रक्रियेद्वारे राखला जातो.

रेजिमेंटल थेरपीच्या विविध पद्धती आहेत

'तालीक' किंवा जळू उपचार.

या पद्धतीत औषधी जळू काही काळ रोगग्रस्त भागाशी जोडली जाते, नंतर जळू आपोआप अलग होते किंवा मीठ लावून अलग होते. आधुनिक विज्ञानाने सांगितले की, जळूच्या लाळेमध्ये वेदनाशामक, गुठळ्याविरोधी घटक हिरुडिन, वेगवेगळे रासायनिक मध्यस्थ, दाहक-विरोधी मध्यस्थ, कर्करोगविरोधी घटक इत्यादी असतात. जळू थेरपी सामान्यतः संधिवात, संधिरोग, उच्च रक्तदाब, हृदयरोग, त्वचा रोगात वापरली जाते., मधुमेही पायाचे व्रण, मेंदुज्वर, अलोपेसिया, व्हेरिकोज व्हेन, हत्तीरोग, कर्करोग इ.

'फॅस्ड' किंवा वेनिसेक्शन.

हे मुख्यतः प्राचीन ग्रीसमध्ये वापरले जात असे. या पद्धतीत एक विशिष्ट रक्तवाहिनी कापली जाते आणि विशिष्ट प्रमाणात रक्त काढले जाते. मग रक्तस्त्राव थांबविण्यासाठी शिरा पुन्हा तयार केल्या जातात. ही पद्धत उच्च रक्तदाब, रक्तातील विष, त्वचारोग, मूळव्याध इत्यादींमध्ये वापरली जाते.

'हिजामा' किंवा कपिंग.

या पद्धतीत रुग्णाच्या शरीराला वेगवेगळ्या प्रकारचे कप जोडले जातात.

हिजामा तीन प्रकारचा असतो;

(i) कोरडा हिजामा (येथे त्वचा छाटलेली नाही आणि रक्त काढले जात नाही).

(ii) ओला हिजामा (येथे त्वचा छाटली जाते आणि रक्त काढले जाते).

(iii) कोरडा मसाज हिजामा (येथे त्वचेवर तेल लावले जाते, जेणेकरून कप सुरळीतपणे हलू शकतील).

संधिवात, संधिरोग, सांधेदुखी, पाठदुखी, त्वचा रोग, उच्च रक्तदाब, वैरिकास शिरा, मायग्रेन, वंध्यत्व, स्त्रीरोगविषयक समस्या इत्यादींमध्ये हिजामाचा वापर केला जातो.

'इलाज बिल अबर' किंवा ॲक्युपंक्चर.

या पद्धतीत, पातळ लवचिक सुया मानवी शरीरात घातल्या जातात आणि ठराविक कालावधीसाठी ठेवल्या जातात. ॲक्युपंक्चरचा उद्देश मज्जासंस्थेतील महत्त्वाचा अवयव सक्रिय करणे आणि रोग बरा करणे हा आहे. ॲक्युपंक्चर विविध रोगांमध्ये वापरले जाऊ शकते, परंतु मुख्यतः बेल्स पाल्सी, कार्पल टनेल सिंड्रोम, हेमिप्लेजिया, पक्षाघात, मायोपॅथी, फ्रोझन शोल्डर इत्यादी चिंताग्रस्त विकारांमध्ये वापरले जाते.

'रियाजत' किंवा व्यायाम.

ज्या रुग्णाला लठ्ठपणा, मधुमेह, चिंता, नैराश्य, सांधेदुखी इत्यादी विकार आहेत; त्यांना नियमितपणे विविध प्रकारचे व्यायाम करण्याचा सल्ला दिला जातो.

'दलक' किंवा मसाज थेरपी.

यात रोगाच्या स्थितीनुसार विविध प्रकारचे मालिश केले जाते. एपिलेप्सी, संधिवात, अर्धांगवायू, हेमिप्लेजीया, कार्पल टनल सिंड्रोम, फ्रोझन शोल्डर, थरथरणे, आकुंचन इत्यादीसारख्या न्यूरोपॅथिक डिसऑर्डरमध्ये मसाजचा वापर केला जातो.

'हमाम' किंवा आंघोळ.

यात रुग्णाला रोगाच्या प्रकारानुसार कोमट पाण्यात किंवा थंड पाण्याने आंघोळ करण्याचा सल्ला दिला जातो. मुळात, मानसिक विकार असलेल्या रुग्णांसाठी ते वापरण्यायोग्य आहे.

'अबजान' किंवा हिप बाथ.

हे फिस्टुला, मूळव्याध, रेक्टल अल्सर, सायटिका, डिसमेनोरिया इत्यादींवर उपचार करण्यासाठी वापरले जाते.

'शामूम' किंवा अरोमा थेरपी.

यात रुग्णाला आवश्यक तेलाचा सुगंध श्वास घेण्याचा किंवा पाण्यात मिसळून शरीरावर लावण्याचा सल्ला दिला जातो. निद्रानाश, डोकेदुखी, मायग्रेन, सायनुसायटिस, चिंता, नैराश्य इत्यादी मानसिक आजारी रुग्णांमध्ये देखील याचा वापर केला जातो.

'नटूल' किंवा सिंचन.

यात ठराविक अंतरावरून औषधी पाणी कपाळावर ओतले जाते. डोकेदुखी, निद्रानाश, मायग्रेन, सायनुसायटिस, चिंता इत्यादींमध्ये याचा उपयोग होतो.

'तकमीद' किंवा फोमेंटेशन.

यात गरम कपड्याची वाफ अंगावर लावली जाते. हे प्रामुख्याने वेदनांमध्ये वापरले जाते.

याशिवाय, 'तारीक' किंवा घाम येणे, 'पशवा' किंवा फूटबाथ, 'अमोले के' किंवा दागणे, 'हुकना' किंवा डूचे, 'काई' किंवा एमेसिस, 'इद्रारे बोल' किंवा डायरेसिस, 'इशाल' यासारख्या इतर पद्धती देखील आहेत. किंवा शुद्धीकरण, 'टॅन्फी' किंवा कफ इ.मुळात, रुग्णाला औषध देण्याव्यतिरिक्त एक किंवा अधिक रेजिमेंटल थेरपीचा सल्ला दिला जातो. आणि त्याचा परिणाम जलद आणि उत्तम होतो.

स्वतःला व्यस्त ठेवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे मानवतेची सेवा करणे-हकीम अजमल खान यांच्या कार्याचा गौरव म्हणुन 11 फेब्रुवारी रोजी युनानी दिवस म्हणून साजरा करुया जिल्हा रुग्णालय वाशिम, उपजिल्हा रुग्णालय कारंजा तसेच ग्रामीण रुग्णालय मंगरूळपीर या ठिकाणी आयुष्य विभागाअंतर्गत ही उपचार पद्धती चालू आहे याचा नागरिकांनी लाभ घ्यावा

डॉ. भाग्यवंत मंगेश
चिकित्सा मानसशास्त्रज्ञ,
जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम, वाशिम

प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचे 2017 ते मार्च 2024 कालावधीत 35,26,265 लाभार्थी

गर्भवती माता व त्यांच्या नवजात बालकांचे तसेच स्तनदा मातेचे आरोग्य सुधारावे व त्यांना सकस पोषण आहार घेण्यास प्रोत्साहित करून त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी, या हेतूने प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा प्रारंभ करण्यात आला. या योजनेंतर्गत 2017 ते मार्च 2024 कालावधीत 35,26,265 लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहे.

गरोदरपणात आणि बाळंतपणात महिलांना आरोग्य सेवा-सुविधा आणि प्रोत्साहनाच्या माध्यमातून कुपोषणाचा प्रभाव कमी करणे आणि माता व बाल आरोग्य सुधारणे हा प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा उद्देश आहे. या योजनेंतर्गत पहिल्या अपत्यासाठी दोन हप्त्यांत 5,000 रु. ची मदत दिली जाते. पहिला हप्ता 3,000 रु.चा असून त्यासाठी राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या शासकीय आरोग्य केंद्रात गर्भधारणेची नोंदणी आणि शेवटच्या मासिक पाळीच्या तारखेपासून 6 महिन्यांच्या आत किमान एक प्रसूतीपूर्व तपासणी करणे आवश्यक आहे. दुसरा हप्ता 2,000 रु. असून त्यासाठी बाळाची जन्म नोंदणी आणि बालकास बीसीजी, ओपीव्ही झीरो, ओपीव्ही 3 मात्र, पेन्टाव्हॅलेन्टलसीच्य 3 मात्रा अथवा समतुल्य / पर्यायी लसीकरणाचे प्राथमिक चक्र पूर्ण करणे आवश्यक आहे. दुसरे अपत्य मुलगी असल्यास तिच्या जन्मानंतर एक रकमी 6,000 रु. मदत दिली जाते. त्यासाठी जन्म दाखला असणे आवश्यक असून बालकाचे पेन्टा 3 पर्यंतचे (14 आठवडे) लसीकरण पूर्ण झालेले असणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाच्या दि. 14 जुलै 2022 रोजीच्या पत्रानुसार प्रधानमंत्री मातृ वंदना योजना - 2 नव्या स्वरूपात देशात लागू करण्यात आली आहे. या योजनेमध्ये पूर्वी केवळ पहिल्या अपत्यासाठी लाभ मिळत असे, मात्र आता नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार दि. 1 एप्रिल 2022 नंतर दुसरे अपत्य मुलगी जन्माला आल्यानंतरच्या लाभार्थींचा देखील या योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. नवीन निकष पात्र लाभार्थी शोधून आशा किंवा अंगणवाडी सेविका त्यांच्या कार्यक्षेत्रातील लाभार्थींची ऑनलाइन पीएमएमव्हीवाय सॉफ्टवेअरमध्ये लाभार्थी नोंदणी केली जाते. लाभार्थी पहिल्या खेपेचा असेल तर दोन टप्प्यात फॉर्म भरला जातो. दुसऱ्या जिवंत अपत्याच्या वेळी मुलगी असणारे लाभार्थी असतील त्यांचे एकच टप्प्यात फॉर्म भरला जातो. याशिवाय पात्र लाभार्थी पोर्टलवर स्वतः लाभासाठी नोंदणी करू शकतात.

प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेंतर्गत गेल्या वर्षभरात जानेवारी 2024 ते नोव्हेंबर 2024 दरम्यान राज्यातील 2,82,239 लाभार्थ्यांनी लाभ घेतला असून, सन 2020-21 मध्ये 5,47,219, सन 2021-22 मध्ये 6,09,921, सन 2022-23 मध्ये 5,21,750 आणि सन 2023-24 मध्ये 1,19,828 लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहेत.

काय आहेत निकष?

प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थी खालीलपैकी किमान एक गटातील असणे आवश्यक (किमान एका ओळखपत्राच्या पुराव्याची प्रत जोडणे आवश्यक)-

1) ज्या महिलांचे निव्वळ कौटुंबिक उत्पन्न रु. 8 लाख पेक्षा कमी आहे.

2) अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती

3) ज्या महिला 40 टक्के किंवा पूर्णतः दिव्यांग आहेत.

4) बीपीएल शिधापत्रिका धारक महिला.

5) आयुष्मान भारत अंतर्गत प्रधान मंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) अंतर्गत महिला लाभार्थी.

6) इ- श्रम कार्ड धारण करणाऱ्या महिला.

7) किसान सन्मान निधी अंतर्गत लाभार्थी महिला शेतकरी.

8) मनरेगा जॉब कार्ड घेतलेल्या महिला.

9) गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या अंगणवाडी सेविका

(AWW)/ अंगणवाडी मदतनीस (AWHs) / आशा कार्यकर्ती (ASHAS)

10) अन्नसुरक्षा कायदा 2013 अंतर्गत रेशनिंग कार्ड धारक महिला

वरील नमूद किमान एका कागदपत्रासोबत खालील कागदपत्रे व तपशील देणे आवश्यक आहे.

1) लाभार्थी आधार कार्ड प्रत किंवा आधार नोंदणी (EID) कागदपत्र त्यासोबत विहित केलेले कागदपत्र.

2) परिपूर्ण भरलेलेमाता आणि बाल संरक्षण कार्डज्यामध्ये शेवटच्या मासिक पाळीचा दिनांक, गरोदरपणाची नोंदणी दिनांक, प्रसुतीपूर्व तपासणीच्या नोंदी असाव्यात.

3) लाभार्थींच्या स्वतःच्या बँक पासबुकची प्रत.

4) बाळाचे जन्मनोंदणी प्रमाणपत्र प्रत.

5) माता आणि बाल संरक्षण कार्डवर बाळाच्या लसीकरणाच्या नोंदी असलेल्या पानाची प्रत.

6) गरोदरपणाची नोंदणी केलेला R C H पोर्टल मधील लाभार्थी नोंदणी क्रमांक.

7) लाभार्थींचा स्वतःचा किंवा कुटूंबातील सदस्यांचा मोबाईल क्रमांक.

8) वेळोवेळी विहित केलेले अन्य कागदपत्र.

येथे होते मोफत तपासणी व प्रसूती

- प्राथमिक आरोग्य केंद्र
- आरोग्य उपकेंद्र
- ग्रामीण रुग्णालय
- उपजिल्हा रुग्णालय
- जिल्हा रुग्णालय
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे रुग्णालय

आदी ठिकाणी गरोदर मातांची मोफत तपासणी व प्रसूती होते.

मानसिक आरोग्य

मानसिक आरोग्य सेवा कायदा 2017

मानसिक आरोग्य सेवा कायदा भाग मानसिक आरोग्य कायदा 1987 रद्द केल्यानंतर 29 मे 2018 रोजी अमलात आला.

हा कायदा सर्व व्यक्तींच्या मानसिक आरोग्य सेवा आणि उपचारांबाबत त्यांच्या इच्छेनुसार निर्णय घेण्याची क्षमता प्रदान करतो तसेच मानसिक आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया अनूपालन आणि सुरक्षा उपाय देखील विहित करतो या कायद्याची अंमलबजावणी करणारे सरकारी अधिकारी मानसिक आरोग्य सेवा देणारे व्यावसायिक यांच्या जबाबदाऱ्या हा कायदा निश्चित करतो तसेच या कायद्याद्वारे मानसिक आजारी रुग्णांचे हक्क आणि अधिकार यांच्या संरक्षण आणि संवर्धनाची जबाबदारी केंद्र व राज्य सरकारे आणि मानसिक आरोग्य आस्थापनांवर निश्चित केलेली आहे

मानसिक आजार असलेल्या व्यक्तींचे हक्क आणि अधिकार खालील प्रमाणे आहेत

1) मानसिक आरोग्य सेवांमध्ये प्रवेश करण्याचा अधिकार कलम 18 Right to Access Mental Healthcare (Section 18) जात वर्ग लिंग धर्म संस्कृती श्रद्धा अपंगत्व यावर आधारित भेदभाव न करता सर्व मानसिक आरोग्य सुविधा या मनोरुग्णांना प्रदान केल्या जातील तसेच या सेवा सुविधा परवडणाऱ्या किमतीमध्ये उत्तम दर्जाच्या व पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध असणे कायद्याने बंधनकारक आहे

2) समानता आणि भेदभाव न करण्याचा अधिकार (कलम 21) Right to Equality and Non-Discrimination (Section 21) कोणताही भेदभाव न करता समानतेवर आधारित आपत्कालीन सेवा सुविधा रुग्णवाहिका सेवा तसेच राहण्याची परिस्थिती व कोणत्याही आरोग्य सुविधा या जशा शारीरिक आजारी व्यक्तींना दिल्या जातात तशाच प्रकारे कुठेही विसंगती नसल्याची खात्री करून सर्व मानसिक रुग्णांना दर्जेदार मानसिक आरोग्य सुविधा देणे कायद्याने बंधनकारक आहे.

3) सामुदायिक समूहामध्ये राहण्याच्या अधिकार (कलम 19) Right to Community Living (Section 19)

मानसिक आजारी व्यक्तींना समाजात राहण्याचा व समाजाचा एक भाग बनण्याचा अधिकार आहे त्यांना कोणत्याही कारणास्तव समाजापासून वेगळे करता येणार नाही तसेच ज्या मानसिक आजारी व्यक्ती बेघर आहेत किंवा ज्यांची काळजी घेण्यास त्यांचे कुटुंब किंवा नातेवाईक अस्तित्वात नाहीत या कारणास्तव त्यांना मेंटल हेल्थ इस्टॅब्लिशमेंट मध्ये दीर्घकाळ ठेवता येणार नाही अशा परिस्थितीमध्ये केंद्र व राज्य सरकारी यांनी अशा व्यक्तींना Mental Health Establishment मध्ये न ठेवता त्यांच्यासाठी सामाजिक पुनर्वसन गृहे (Community Rehabilitation Services) आश्रयगृहे (Sheltered Homes) समर्थित गृहे (Supported accomodation) to अशा प्रतिबंधात्मक आस्थापना उभारल्या पाहिजेत.

4) क्रूर अमानुष आणि अपमानास्पद वागणुकीपासून संरक्षणाच्या अधिकार (कलम 20)

Right to Protection from Cruel, Inhuman and Degrading Traetment (Section 20)

मानसिक आजारी व्यक्तींना सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे ते मनोरुग्ण आहेत म्हणून त्यांना क्रूर अमानुष किंवा अपमानास्पद वागणूक सेवा प्रदान करताना देता येणार नाही याउलट अशा वागणूकीपासून त्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येक Mental Health Establishment ची जबाबदारी आहे.

5) माहितीच्या अधिकार (कलम 22)

Right to Information (Section 22)

मानसिक आजारी व्यक्तींना तसेच त्यांच्या नामनिर्देशित विप्रतिनिधींना कायद्याच्या तरतुदीबाबत व प्रवेशाचे निकष याची माहिती देणे बंधनकारक आहे याची एक प्रत सोप्या भाषेत रुग्णास समजावून सांगितली पाहिजे व्यक्तीच्या मानसिक आजाराचे स्वरूप उपायोजना आणि उपचाराचे संभव्य परिणाम याची माहिती Mental Health Establishment ने देणे गरजेचे आहे वार्ड परिसर

लॉजिस्टिक, औषधे देण्याचे वेळापत्रक, राहण्याच्या सुविधा इत्यादी बाबतची माहिती देणे गरजेचे आहे

6) गोपनीयतेच्या अधिकार (कलम 23/24)
(Right to Confidentiality Section 23/24)
मानसिक आजार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला त्यांचे मानसिक आरोग्य मानसिक आरोग्य सेवा उपचार याबाबत गोपनीयतेच्या अधिकार आहे एखाद्या मनोरुग्णाची माहिती त्याच्या सुचित संमतीशिवाय इतर कोणास दिली जाऊ शकत नाही अपवादात्मक परिस्थिती जसे की जीवितास धोका टाळण्यासाठी किंवा कायद्यानुसार कर्तव्य पार पाडण्यासाठी किंवा आरोग्य व्यावसायिकाला उपचार देण्यासाठी माहिती देता येईल.

7) वैद्यकीय नोंदी मिळण्याचा अधिकार (कलम 25)
Right to Access Records (Section 25)
मानसिक आजारी व्यक्तीला त्याच्या वैद्यकीय नोंदी मिळण्याचा अधिकार आहे यामध्ये आजाराचा इतिहास निदान तपास व उपचार इत्यादी नोंदीच्या समावेश होतो यासाठी व्यक्तीने मानसिक आरोग्य सेवा कायदा नियम सहा अर्ज 17 नुसार प्रभारी MO/MHP ला अर्ज करावा लागतो तथापि जर प्रभारी MO/MHP अपवादात्मक परिस्थितीमध्ये माहिती प्रकटीकरणामुळे जर व्यक्तीला गंभीर मानसिक आणि किंवा इतर व्यक्तींना इजा होण्याची शक्यता असल्यास माहिती रोखू शकतात.

8) वैयक्तिक संपर्क आणि संप्रेषणाचा अधिकार (कलम 26)
Right to Personal Contacts and Communication (Section 26)
Mental Health Establishment मध्ये दाखल रुग्णांच्या अभ्यागतांना नकार देण्याचा किंवा भेटण्याचा अधिकार आहे जर मनोरुग्नांना समाजातील कोणत्याही व्यक्तीकडून मेल किंवा ई-मेल किंवा दूरध्वनी संवाद साधण्याचा किंवा नकार देण्याचा अधिकार आहे तथापि अपवादात्मक परिस्थितीमध्ये संबंधित रुग्णभेट नाकारता येणार नाही उदाहरणार्थ न्यायाधीश, मानसिक आरोग्य अवलोकनार्थ मंडळ, CMHA, SMHA चे सदस्य सांसद कायदेशीर प्रतिनिधी व्यक्तीच्या उपचारासाठी प्रभारी वैद्यकीय व्यवसाय इत्यादी.

9) कायदेशीर मदतीचा अधिकार (कलम 27)
Right to Legal Aid (Section 27)
मानसिक आजार असलेल्या सर्व व्यक्तींना मोफत कायदेशीर सेवा मिळण्याचा अधिकार आहे याबाबत त्याचा प्रवेशाच्या वेळी त्याला सुचित करणे बंधनकारक आहे

10) सेवांच्या तरतुदीतील कमतरतेची तक्रार करण्याचा अधिकार (कलम 28)
Right to Make Complaints about Deficiencies in provisions of Service (Section 28)
मानसिक आजारी व्यक्ती Mental Health Establishment मधील काळजी उपचार आणि सेवांच्या तरतुदीतील कमतरतेबद्दल प्रभारी MO/MHP, मानसिक आरोग्य अवलोकनार्थ मंडळ किंवा SMHA कडे रीतसर तक्रार करू शकतो.

11) महिला रुग्णांच्या मालकीच्या मुलाच्या ताबा (कलम 212) Custudy of Child Belonging to Woman Patient (Section 212)
Mental health Establishment मध्ये दाखल झालेल्या महिलेच्या तीन वर्षाखालील मूल तिच्या वास्तव्यादरम्यान आईपासून वेगळे करता येणार नाही तथापि अपवादात्मक परिस्थितीमध्ये जेव्हा उपचार करणाऱ्या मानसोपचार तज्ञांच्या मते बालकाचे आईजवळ ठेवल्याने त्याच्या जीविकास धोका आहे अशावेळी मुलाला तिच्यापासून विभक्त केले जाते.

मुल आई पासून विभक्त झाल्यास विभक्त होण्याच्या कालावधीमध्ये महिलेला Mental Health Establishment किंवा कुटुंबातील कर्मचाऱ्यांच्या देखरेखी खाली मुलास भेटणे शक्य आहे.

12) वैद्यकीय विमा (कलम 214)
Medical Insurance (Section 214)
विमाधारकांना जशी शारीरिक आजारावर वैद्यकीय विम्याची तरतूद आहे तसेच तरतूद मानसिक आजारांवर करणे बंधनकारक आहे याचा अर्थ असा होतो की विमा पॉलिसी नुकसान भरपाई योजना प्रीमियम किंमत प्रतिपूर्ती कालावधी इत्यादी मध्ये कोणताही भेदभाव नसावा जर विमा कंपन्या मानसिक आजाराच्या उपचारासाठी वैद्यकीय विम्याची तरतूद करत नाही तर त्यांना कलम 108 व 109 अंतर्गत गुन्हा करण्यासाठी जबाबदार धरणे जाऊ शकते

वैद्यकीय विमा नाकारणाऱ्या कोणत्याही विमा कंपन्यांविरुद्ध तक्रार दाखल करू शकतात.

मानसिक आरोग्य हा आरोग्याचा महत्वाचा घटक आहे राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत आरोग्य कर्मचारी आणि अधिकारी यांची कर्तव्ये.

1982 साली राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम सुरु करण्यात आला. त्याची मुख्य उद्दिष्टे खालील प्रमाणे,

1) गंभीर मानसिक आजार होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे.

ii) समाजामध्ये मानसिक आरोग्य विषयी जाणीव निर्माण करणे.

iii) मानसिक आजाराबद्दलच्या गैरसमजुती दूर करणे.

IV मानसिक आजारांवर त्वरित उपचार करणे.

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी खालील प्रमाणे कामे आरोग्य कर्मचारी व अधिकारी यांना करणे अनिवार्य आहे.

() MHCA 2017 या कायद्याबाबत व रुग्णांच्या हक्कांबाबत जनजागृती करणे.

3) मनीरुग्ण एकदा मानसिक आरोग्य संस्थेमध्ये आणून दाखल केल्यानंतर त्याला न स्वीकारणे ही सामाजिक मानसिकता बदलणे.

4) एक महिन्यामध्ये रुग्ण स्थिर झाल्यानंतर त्याला नातेवाईकांमध्ये सोडून त्याच्या हक्कांचे संरक्षण करणे, त्याचे पुनर्वसन करणे व नियमित आयुष्य जगण्यासाठी त्यास मदत करणे.

v) रुग्णशोध आपल्या कार्यक्षेत्रांमध्ये गृह भेटीद्वारे मनोरुग्न सोधणे व त्यास संदर्भ सेवा देऊन डॉक्टरांकडे उपचारासाठी पाठविणे, रुग्णशोध मोहिमेमध्ये ग्रामपंचायत, स्थानिक पुढारी, शिक्षक, तरुण मंडळे, अंगणवाडी, महिला मंडळ, प्रशिक्षित व्यक्ती यांची मदत घेणे. त्या ओकांमार्फत मनोरुग्णांची लक्षणे ओळखून प्रत्यक्ष भेट देऊन रुग्णांना संदर्भ सेवा देणे.

V) खालील प्रमाणे लक्षणांवर आधारित ओकांचा शोध सर्वोच्या मदतीने घेणे.

असंबंधित बोलणे, वागणे, सुन्न व शांत होणे किवा अबोल होऊन कोणामध्ये न मिसळणे, इतरांना न ऐकू येणारे आवाज ऐकणारे किंवा इतरांना न दिसणाऱ्या वस्तू दिसतात असे सांगणारे, संशयी वृत्ती, विनाकारण रडणारे. दुःखी होणारे, आत्महत्येविषयी बोलणारे किया प्रयत्न करणारे, अंगात देव येणारे, दारू, अफू, गांजा व्यसन करणारे. वेड्यासारखे गावामध्ये फिरणारे, फिट येणारे मतिमंद वाढ खुंटलेले.

4) मानसिक आरोग्य शिक्षण देणे.

vi) शालेय आरोग्य भेटीद्वारे आरोग्य शिक्षण.

ix गृहमेटीमध्ये गरोदर मातांची काळजी व बालसंगोपनाद्वारे मुलांच्या आरोग्याची काळजी घेणे.

डॉ. सुनिल विठ्ठलराव बोराडे
वैद्यकीय अधिकारी गट - अ

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विशेष नवजात काळजी कक्षांमध्ये चार वर्षांत 2,77,114 बालकांवर यशस्वी उपचार

पुणे- अर्भक व नवजात शिशु मृत्यू दर कमी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सातत्याने प्रयत्न करण्यात येत असून, शासकीय रुग्णालयांतील विशेष नवजात काळजी कक्षांमध्ये (एसएनसीयू) सन 2020 ते नोव्हेंबर 2024 या कालावधीत एकूण 2,77,114 बालकांना दाखल करून मोफत यशस्वी उपचार करण्यात आले. याच कालावधीत नवजात शिशु मृत्यू दर कमी करण्यात आरोग्य विभागाला यश आले आहे.

राज्यातील अर्भक व नवजात शिशु मृत्यू दर कमी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. या प्रयत्नांना यश येत असल्याचे गेल्या काही वर्षांच्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. आरोग्य विभागाच्या वतीने नवजात बालकांचे आजार व मृत्यू टाळण्यासाठी व बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी विविध योजना राबविल्या जातात. या सर्व योजनांची अंमलबजावणी राज्य व जिल्हा स्तरावरून करण्यात येते.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, सन 2020-21 व सन 2021-22 या कालावधीत एसएनसीयूमध्ये 97,392 बालकांना दाखल करून उपचार करण्यात आले. तसेच सन 2022-23 ते सन 2024-25 (नोव्हेंबर 2024 अखेर) या कालवधीत एसएनसीयूमध्ये 1,79,722 बालकांना दाखल करून उपचार करण्यात आले. मागील दोन वर्षांमध्ये एसएनसीयूमध्ये दाखल करून उपचार केलेल्या बालकांमध्ये वाढ होत आहे. सन 2024-25 (नोव्हेंबर 2024 अखेर) या कालावधीचा नवजात शिशु मृत्यू दर हा सन 2020-21 वर्षातील 7.50 टक्के वरून 5.04 टक्क्यांवर आलेला आहे. गेल्या तीन वर्षांमध्ये एसएनसीयू मधील मृत्यू दर 2.46 टक्क्यांनी कमी झाला आहे. तीन वर्षांत कमी वजनाच्या 6,798 नवजात बालकांवर यशस्वी उपचार

एसएनसीयूमध्ये दरवर्षी अंदाजे 50,000 गंभीर आजारी बालकांवर उपचार केले जातात. सन 2022-23, 2023-24 व 2024-25 (नोव्हेंबर 2024 अखेर) या कालावधीत अत्यंत कमी वजनाच्या (1,500 ग्रॅमपेक्षा कमी) एकूण 6,798 नवजात बालकांवर यशस्वीरित्या उपचार करून नवजीवन मिळाले आहे.

एसएनसीयूमध्ये उपलब्ध सुविधा:

जिल्हा, महिला, उपजिल्हा रुग्णालयांत आजारी नवजात आणि कमी वजनाच्या नवजात बालकांचे व्यवस्थापन आणि उपचार करण्यासाठी विशेष नवजात काळजी कक्ष (एसएनसीयू)ची स्थापना करण्यात आलेली आहे. राज्यात 18 जिल्हा रुग्णालये, 12 महिला रुग्णालये, 15 उपजिल्हा रुग्णालये, 3 सामान्य रुग्णालये, 1 ग्रामीण रुग्णालय, 1 शासकीय वैद्यकिय महाविद्यालय आणि 5 कॉर्पोरेशन हॉस्पिटलमध्ये मिळून एकूण 55 एसएनसीयू कार्यरत आहेत. प्रत्येक कक्षामध्ये 1 बालरोग तज्ज्ञ, 2 वैद्यकीय अधिकारी, 10 ते 12 परिचारिका आणि 4 सहाय्यक कर्मचाऱ्यांसह किमान 12 ते 16 खाटा असून, नवजात किंवा विशेष काळजी आवश्यक असणाऱ्या बालकांसाठी चोवीस तास सेवा प्रदान केली जाते. हे युनिट रेडियंट वॉर्मर, फोटोथेरपी युनिट, इन्फ्युजन पंप, सीपॅप मशिन, मॉनिटर्स यांसारख्या वैद्यकीय उपकरणांनी सुसज्ज आहेत.

आजारी नवजात अर्भकांना हायपोथर्मिया, सेप्सिस/इन्फेक्शन, कावीळ, श्वास गुदमरलेली बालके, शरीराचे तापमान कमी झालेली बालके, रक्तातील साखरेचे प्रमाण कमी झालेली बालके, प्रतिजैविक, असिस्टेड फीडिंग, विशेष स्तनपान, जन्मानंतरची काळजी व संदर्भ सेवा इ. यांसारख्या सेवा पुरविल्या जातात. एसएनसीयूमध्ये दाखल कमी वजनाच्या आजारी गंभीर नवजात बालकांना श्वासोच्छवासाच्या आधाराची आवश्यकता असते. त्यांच्याकरिता नॉन-इनवेसिव्ह व्हेंटिलेशन (उदा. सीपीएपी) तसेच अकाली जन्मलेल्या नवजात अर्भकासाठी तांत्रिक समिती मार्फत सर्फेक्टंट वापराबाबत सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार सेवा पुरवल्या जातात. कमी वजनाच्या बाळांसाठी कांगारू मदर सेवा, जन्मजात आंधळेपणा (रेटिनोपॅथीऑफ प्रीमॅच्युरिटी), जन्मजात बहिरेपणा (ओएई/बीईआरए चाचणी) यांसारख्या विशेष तपासण्या केल्या जातात. या ठिकाणी सर्व तपासण्या व उपचार मोफत केले जातात.

गोष्टी सांगा, बारीक व्हा

जाड आहे का मी व माझे बाळ? मुलाचं पोट मोजून कळेल. शाळेतील मुलांची आरोग्य तपासणी झाली. दर तिसरा, चौथा मुलगा जाड होता. म्हणून पालक सभा भरली होती. बहुतेक जाड मुलांचे पालकपण जाड होते. ते काळजीत होते. डॉक्टर जोशींना मार्गदर्शनासाठी बोलावले होते. पालकांनी विचारले की, आम्ही व मुले जाड आहे का? हे कसे कळेल?

डॉक्टर जोशी म्हणाले, पोटाचा घेर मोजून कळेल. पोटाचा घेर जास्त तर आपण व मुले जाड म्हणजे आजारी. आयुष्य कमी. शोले चित्रपटात, आपल्या सचिन या मुलाचा मृत्यू बघून बाप ए के हंगल म्हणतो 'जगात सर्वात मोठे दुःख कोणते? आपल्या मुलांचे मरण बघणे.' जाडेपणा नावाच्या आजाराने आपल्या घरी हे होऊ नये. पोट जास्त असेल तर येथे दिलेल्या जादूने मी ते कमी करेन. रक्तदाब, मधुमेह, जाडेपणा यातून मुक्त होऊन 100 वर्षे मस्त जगेन. कापड मोजायच्या टेपने (मोजपट्टीने) आपल्या पोटाचा घेर मोजा.

मोठ्या बाई व माणसात पोट 80 सेंटीमीटर म्हणजे 32 इंचापेक्षा जास्त म्हणजे आपण जाड. 80 सेंटीमीटर (32 इंच) मापाची चड्डी लागत असेल तर आपण जाड. भारतीय तज्ज्ञ मुलांमध्ये ... 2 वर्षाला पोटाचा घेर 49 सेंटीमीटर असेल तर ते बाळ जाड 3 वर्षाला पोटाचा घेर 50 सेंटीमीटर म्हणजे 20 इंच असेल तर ते जाड. पोटाच्या घेराचा हा आकडा यानंतर दर वर्षी 3 सेंटीमीटरने वाढतो. (1.2 इंचाने वाढतो.) बाळाच्या पोटाचा घेर किती सेंटीमीटर असेल तर ते बाळ जाड?

3 वर्षाला 50 सेंटीमीटर (3,50), 4 वर्षाला 53 सेंटीमीटर (4,53), 5 वर्षाला 56 सेंटीमीटर (5,56), 6 वर्षाला 59 सेंटीमीटर (6,59), 7 वर्षाला 62 सेंटीमीटर (7,62), 8 वर्षाला 65 सेंटीमीटर (8,65), 9 वर्षाला 68 सेंटीमीटर (9,68), 10 वर्षाला 71 सेंटीमीटर (10,71), 11 वर्षाला 74 सेंटीमीटर (11,74), 12 वर्षाला 77 सेंटीमीटर (12,77), 13 वर्षाला व त्यापुढे 80 सेंटीमीटर असेल तर ते बाळ जाड.(13,80) (कंसातले आकडे पाठ करा.)

मोठ्यांचा रक्तदाब, मधुमेह लहानपणीच जाडेपणासह सुरु होतो.

तो लहानपणीच बरा करा. पोट दिसते म्हणजे, अंगात चरबी, साखर व रक्तदाब जास्त आहे. यानंतर 7 वर्षांनी मधुमेहाचे निदान होते, असा चिनी अभ्यास आहे. उच्च रक्तदाब असतोच. ही बुडणारी नाव असते. सर्व औषध करुनही 20-30 वर्षात मरण. हा अनुभव आहे, असे आपले व आपल्या मुलांचे यासमोर होऊ नये म्हणून ही जादू करा.

कोणत्या वयात किती पोट असेल तर बाळ जाड हे जाणायचे सूत्र-

(वय - 3) × 3) + 50

6 वर्षाला (6 - ×) 3 + 50 = 59

वजन व पोट कमी करायची जादू, यातील जे जे जमेल ते आत्तापासून करा.

- पाणी, ताक, भाज्या कोशिंबिरी व बिन गोड फळे भरपूर घ्या. त्याने वजन, चरबी, पोट कमी होते.
- 1 चहा, किंवा 1 नाश्ता, किंवा 1 पोळी, किंवा 1 वाटी भात रोज कमी करा. वर्षाला 3 किलो वजन घटते. चहा, बिस्कीट, बेकरीचे व बाहेरचे पदार्थ टाळा. त्या ऐवजी पाणी, ताक, भाज्या, कोशिंबिरी व बिन गोड फळे घ्या.
- जमले तर रात्री जेवू नका त्याबदली कोशिंबिरी बिन गोड फळे, पाणी घ्या.

- कमी बसा. शक्य तेवढी कामे उभ्याने करा. चरबी दुप्पट वेगाने जळते. वजन घटते. डिजिटल काटा घ्या. रोज वजन करा. असे रोज कराल तर रोज 100 ग्राम वजन घटेल, महिन्याला 3 किलो.
- पण एकदा सगळ्यांसह खूप जेवला की 1 किलो वजन वाढेल ते टाळा.
- भूक लागली तरच खा. कमी खा. शिजवलेले अन्न, कमी करा. दर वेळी पाणी जास्त प्या. प्रत्येक पाऊण घास भाजी कोशिंबिरीचा हवा. तेल, तूप, गहू, तांदूळ, मीठ, घराबाहेरचे अन्न कमी वा बंद करा.

नकळत जास्त बसून, जास्त अन्न खाऊन, जाडेपणा येतो. तो कमी खावून, कमी बसल्याशिवाय इतर कशानेही जाणार नाही. थकल्याशिवाय बसू नये. थकवा गेल्यावर बसू नये. शक्य तेवढी कामे उभ्याने व चालत फिरत करावी. टी व्ही समोरच्या खुर्च्या काढा. शक्य तेवढे जलद चाला, फिरा, धावा. तासभर खेळून, कष्ट करून घाम गाळा. ही जगायची किंमत आहे. यानेच चरबी जळेल. नाहीतर चरबी आपल्याला वाळवी सारखी आतून खराब करून 20 वर्षात मारेल. 1 किलो वजन जास्त झाले की 2 मि लिमीटरने रक्तदाब वाढतो. वजन घटले की त्याप्रमाणात रक्तदाब व साखर घटते. आपण रक्तदाब मधुमेह मुक्त होऊ शकतो.

एक डिजिटल वजन काटा घ्या. रोज सकाळी शी शु नंतर उपाशी पोटी वजन करा. ते भिंतीवरील दिनदर्शिकेवर (कॅलेंडरवर) लिहा. वजन रोज घटेल. मज्जा येईल. उत्साह वाढेल. आदल्या दिवशी काय खाल्याने ते घटले/वाढले ते कळेल. तसा बदल आपोआप होईल. पोट वाढले की रक्तदाब वाढतो. प्रत्येकाचा रक्तदाब दर वाढदिवसाला बघा. मुलांचा वाढदिवस दर 6 महिन्यांनी करा. त्यांची वाढ मोजून करा. मुलांची वजन व उंचीची वाढ व रक्तदाब मोजा. त्यांच्या वाढीचा आलेख काढा. जाडेपणा हा घरी सर्वांचा आजार असतो. हे सर्वांसाठी करा. वाढलेले वजन सहजासहजी घटत नाही. मनाने पक्के ठरवा. बारीक व्हायचा हट्ट करा, शपथ घ्या, नवस बोला तरच जाडेपणा कमी होतो. उभ्याने कामे करा. आपण बसतो तेंव्हा तासाला 1 चमचा चरबी जळते. कमी होते.

आपण उभे राहतो तेंव्हा तासाला 2 चमचा चरबी जळते. कमी होते. आपण चालतो तेंव्हा तासाला 3 चमचा चरबी जळते. कमी होते. आपण जिने चढतो, उतरतो तेंव्हा तासाला 4 चमचा चरबी जळते. कमी होते. आपण नाचतो तेंव्हा तासाला 5 चमचा चरबी जळते. कमी होते.

चरबी जाळा. बारीक व्हा. चरबी जाळा. नाहीतर ती आपल्याला चितेवर जाळेल

आपण जाड का होतो?

खावे काय व किती हे माहिती नाही म्हणून.

मोठ्यांनी रोज असे जेवावे. आयुर्वेद सांगतो की मोठ्यांनी नेहमी अर्धी भूकच जेवावे. भारत व जग यातील तज्ज्ञ सांगतात की- भूक लागली की तरच खा. ताटाचे 4 भाग करा. एक भाग डाळ किंवा मांसाहार, एक भाग भात किंवा पोळी व दोन भाग भाजी कोशिंबीर/फळे खा. वाटीभर दही घ्या. त्याने जीवनावश्यक बी 12 जीवनसत्त्व मिळेल. हे सर्व भारतीयांत कमी आहे. फक्त दुधातून मिळते. दुधापेक्षा दह्यात जास्त असते. आपणास रोज दही खावे. जमले तर सर्व दुधाचे दही करावे. चिमूटभर मीठ पुरे. त्यापेक्षा जास्त मिठाने रक्तदाबाचा त्रास होऊ शकतो. व भारतात रक्तदाबाचे प्रमुख मरणाचे कारण आहे. स्वयंपाक घरात मीठ साखर नको. जेवल्यावर पान खा. त्याने पोट भरेल. समाधान मिळेल. चुना मिळेल. त्याने दात व हाडे बळकट होतील. दातकिड कमी होईल. ज्याचे /जिचे पोट दिसते त्याने पाऊण ताट भाजी कोशिंबीर / फळे व एक भाग डाळ, घ्यावा. भात पोळी कमी करावी.

मुलांसाठी: बाळ जन्मताच त्याला आईच्या छातीला लावावे. 6 महिने फक्त आईचे दूध घ्यावे. बाळ 6 महिन्याचे झाले की त्याला मांडीवर बसवून घरचे सर्व अन्न मऊ करून चाटवावे. दर वेळा आईच्या दुधाआधी द्यावे. त्यांना सर्व चवी कळतात. सर्व पदार्थ द्या. वाढदिवसापर्यंत घरचे सर्व जेवण द्या. 18 वर्षाचे होईपर्यंत मुले वाढतात. तोपर्यंत त्यांना पोटभर अन्न द्यावे. खूप वेळा द्यावे. गरजेपेक्षा जास्त खाल्लेल्या प्रत्येक कण अन्नाची चरबी होते. पोट दिसते तेंव्हा आपले अंदाजे पाव वजन चरबीचे असते. ती आपण जेवत नाही तेंव्हा वापरली जाते. पोट दिसते तेंव्हा आपण न जेवता 100 दिवस राहू शकतो. आठवड्याला 2 उपास करणे चांगले आहे. डॉक्टरवर विश्वास ठेवा. हे सर्वांना सांगा.

डॉ. अर्चना जोशी,
एम.बी.बी.एस.एम.डी (बालरोग)
डॉ. हेमंत जोशी,
एम.बी.बी.एस.एम.डी (बालरोग)

स्त्री सन्मान

जागतिक आरोग्य संघटनेतर्फे आग्नेय आशियातील भारत, इंडोनेशिया, थायलंड, म्यानमार ह्या चार देशांत माता बाल संगोपानावरील कमी वजनाच्या मुलांवर आणि धोका असलेल्या माता बालकांची काळजी घेण्याबद्दल 1977 ते 1984 मधे दोन प्रकल्प राबवले गेले. बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या रोग प्रतिबंधक विभागप्रमुख डॉक्टर उषा शहा ह्यांची भारतात राबवल्या जाणाऱ्या प्रकल्पाच्या मुख्य संशोधक म्हणून निवड झाली. मी रोगप्रतिबंधक आणि सामाजिक औषधशास्त्र (Preventive and Social Medicine)ह्या विषयात MD केले होते आणि बालरोगांवर डिप्लोमा(D C H) केला होता. त्यामुळे ह्या माता-बाल प्रकल्पामधे काम करण्यास त्यांनी मला त्यांची मदतनीस म्हणूननिवडले.

हा प्रकल्प शिरूर ह्या ग्रामीण प्रशिक्षण केंद्रात राबावला गेला. सातवीच्या पुढे शिक्षण घेतलेल्या,दर हजार लोकसंख्येमागे एक अशा ग्रामीण आरोग्य सेविकांच्या मदतीने हा प्रकल्प राबवला गेला. प्रशिक्षण केंद्राच्या 32 गावांमधील सेविकांना ह्या प्रकल्पात काम करण्यासाठी सुरवातीचे शिक्षण देवूननंतर आठवड्यातून एक दिवस गरोदर स्त्रीची तपासणी, नवजात बालकाची तपासणी, बाळाचे वजन घेणे,माता आणि बालकांमधील धोके ओळखणे, त्यांच्यावरील उपचार, संदर्भ सेवा यांबद्दलचे मार्गदर्शन आम्ही करत असू. तसेच त्यांच्या कडून प्रत्येक माता आणि बालकांची माहिती पण गोळा करीत असू.त्यांच्याबरोबर काम करता करता खेड्यापाड्यातील बायकांचे जीवन, त्यांच्या अडचणी, त्यांची समजातली स्थिती ह्या गोष्टी मला जवळून पहाता आल्या. एक दोन घटना अशा घडल्या की ज्या माझ्या मनाला चटका लावून गेल्या.

प्रकल्पामधल्या प्रत्येक गरोदर स्त्रीची गरोदरपणातील, बाळंतपणातील, आणि बाळंतपणानंतर आईची आणि बाळाची माहिती गोळा करून सविस्तरपणे वहीमधे लिहून ठेवायचे काम ह्या आरोग्य सेविका करत असत. एखादी बाई किंवा बाळ दगावले, गरोदरपणात किंवा बाळंतपणात गुंतागुंत झाली तर त्या घरी जाऊन चौकशी करून येत. आम्ही मग त्या धोक्याच्या आणि मृत्यू पावलेल्या माता बालकांची माहिती त्यांच्याकडून घेऊन प्रश्नावलीमधे भारत असू.

एक 3000 ग्रॅम वजनाची मुलगी जन्मानंतर 9 व्या दिवशी गेली होती, तिची माहिती आम्ही घेत होतो. ही शिरूर जवळच्या नारायण गव्हाण येथील ही घटना होती. तिथली आरोग्य सेवका सुमन भोसले बारावी पर्यंत शिकलेली होती आणि अतिशय मनापासून काम करायची. तिने सांगितलेली माहिती चक्रावून टाकणारी होती. ती म्हणाली, ' मॅडम, खरं सांगू की खोटं?' मी म्हटलं, 'आत्तापर्यंत एक तरी खोटी माहिती आम्ही गोळा केली आहे का? मग असे का विचारतेस?' तेव्हा ती म्हणाली, ' मॅडम, मुलीच्या आईने मुलीला दूध पाजले नाही आणि ती मुलगी वारली.'सर्वसाधारणपणे 2500 ग्रॅम म्हणजे अडीच किलो किंवा त्याहून जास्त वजन असले आणि बाळात काही जन्मजात दोष नसला तर सहसा बालमृत्यूहोत नाही. पण ह्या तीन किलो जन्मतः वजन असलेल्या मुलीला केवळ मुलगी झाली म्हणून आणि घरच्यांची सवत आणण्याची हालचाल सुरु झाल्याने आपले आणि आपल्या आधीच्या मुलींचे काय होईल ह्या भीतीने आईनेच मुलीला दूध न पाजून मरू द्यायचे, हे दारुण सत्य मन विषण्ण करणारे होते!

त्याच सुमारास शिरूर मधल्याच एकाने मुलगी झाली म्हणून तिला घोडनदीत फेकले होते. त्याला पोलिसांनी पकडले होते. त्याच्यावर खून करण्याचा आरोपही ठेवला होता.

सोनोग्राफीचा वापर 1980 च्या सुमारास सुरु झाला पण खेड्यापाड्यात पोहोचायला आणखी एक दशक लागले. बाळाचे लिंग गर्भावस्तेत अगदी पहिल्या तीन महिन्यातच कळणे शक्य झाले. सर्वांनाच मुलगा हवा असायचा. त्यामुळे

आपल्या पुरुषप्रधान देशात मुलगी आहे हे कळले की गर्भपात करण्याचे प्रकार होऊ लागले.पुण्याच्या सेवाधाम ह्या सामाजिक संस्थेसाठी मी कोल्हापूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची अधिष्टाता असतांना कोल्हापूरच्या ग्रामीण भागाची पहाणी 2001 साली करून घेतली होती. त्यावेळी देशातील मुलींची संख्या दर 1000 पुरुषांमागे 940 होती. तर कोल्हापूरच्या ग्रामीण भागात एका वर्षाखालील मुलींची संख्या दर 1000 पुरुषांमागे सुमारे 850 इतकी कमी होती. एखाद्या बाईला लागोपाठ मुली झाल्या तर गर्भपात केला जाई,तिच्या जीवाला धोका केला जाई, तिला टाकले जाई, दुसरे लग्न करून आईला सवत आणली जाई. समाजामधे मुलगाचपाहिजे असा आग्रह होता आणि त्यासाठी काहीही करण्याची तयारी होती. आपले घरातील स्थान अबाधित ठेवण्यासाठी आणि आधीच्या मुलींची आबाळ होऊ नये ह्यासाठी तिला आपल्या पोटच्या पोरीचा जन्माच्या आधीच जगण्याचा हक्क नाकारावा लागे, मुलगी आहे ह्या एकाच कारणासाठी मनाविरुद्ध गर्भपत करून घ्यावा लागे.

ह्या पर्श्वभूमीवर, स्त्रीची समाजातील अवस्था जवळून अनुभवल्यावर, जेव्हा मला स्त्रियांच्यासामाजिक स्थानबद्दल कविता करण्याची विनंती केली गेली, त्यावेळी 'स्त्री सन्मान' ही कविता अनाहूतपणे सुचली.

स्त्री आणि पुरुष हे दोघेएका नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोघेही ईश्वरनिर्मित आहे. समाजाचा गाडा नीट चालण्यासाठी, समतोल राखण्यासाठी मुलींचे आणि मुलांचे जन्मप्रमाण आणिमहिला-पुरुषांचे स्थान बरोबरीचे असायला हवे!

डॉ. आशा प्रतिनिधि

सारांश :- स्त्री सन्मान

- *भारतीय समाजामध्ये स्त्रियांचे स्थान बहुतेक वेळा दुय्यम समजले जाते. भारतातील केरळ, पाँन्डेचरी, ईशान्येकडील काही प्रदेश सोडला तर बाकी सर्व राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशमध्ये पुरुषप्रधान समाजरचना आहे.*
- *मुलगा असण्याला भारतात अनन्य साधारण महत्व आहे. जेवण-खाण, शिक्षण, आरोग्यसेवा याबाबतीत मुलगा आणि मुलगी यांच्यामध्ये लिंगभेद केला जातो.*
- *गरोदरावस्थेत गर्भलिंगपरीक्षा केली जाते आणि मुलगी आहे असे समजल्यावर स्त्री-गर्भाची भ्रूणहत्या केली जाते आणि जन्मानंतरसुद्धा निरनिराळ्या पद्धतीने नवजात बालिकेची हत्या केली जाते. मुलींकडे दुर्लक्ष केल्यामुळे मुलींमधील आणि मातांमधील मृत्यूंचे प्रमाण जास्त आहे.*
- *लिंग गुणोत्तर म्हणजे दर हजार पुरुषांमागे असलेले स्त्रियांचे प्रमाण. जीवशास्त्रानुसार पुरुषांपेक्षा स्त्रिया जास्त जगण्याची क्षमता असलेल्या असतात आणि जगातील बहुतेक सर्व देशांमधे लिंग गुणोत्तरात स्त्रियांचे प्रमाण पुरुषांपेक्षा जास्त आहे. पण भारतात मात्र दर हजार पुरुषांमागे हे प्रमाण फक्त 940 आहे आणि दिवसेदिवस ते आणखी घटते आहे. देशातील 9 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये स्त्री भ्रूणहत्या आणि मुलांच्या जन्माला दिलेल्या प्रधान्यामुळे जन्मतः मुलींचे प्रमाण दर हजार मुलांमागे 900 हून कमी आहे. मुलींचे प्रमाण मुलांच्या तुलनेने जन्मानंतर सुद्धा कमी होत आहे.*
- *पुरुषांमधील साक्षरतादर देश पातळीवर 82% आहे तर स्त्रीयांमधीलसाक्षरता दर 65% इतका कमी आहे.*
- *गर्भलिंग चिकित्सेवर बंदी घालून आणि स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने मालमत्तेचे हक्क देऊन सरकार स्त्रियांच्या लिंग गुणोत्तरात सुधारणा करण्याचा प्रयत्न करत आहे. स्त्रियांचाशिक्षणात सुधारणा झाली, स्त्रियांमधे पैसे कमावण्याची क्षमता वाढली आणि स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समाजात स्थान मिळाले तर स्त्रियांचे गुणोत्तर उत्स्फुर्तपणे सुधारू शकेल.*

कविता

॥ स्त्री सन्मान ॥

पुसतसे माय-माऊली, डोळ्यात प्राण आणूनी
मुलगा की मुलगी झाली, परी शब्द येईना कानी
मग मनीच ती समजली, दैवास बोल लावूनी
परत का कन्या झाली? उत्तर ना जाणे कोणी १

सासूची धुसपुस झाली, नणंदेची कुजबुज कानी
सगळ्याच कशा हिस मुली? एकीमेकी पाठूनी
घरातुनी भरल्या उठवी, मातेस दोष लावूनी
आणुनी सवत बसविली, नवऱ्याच्या कानी लागूनी२

जन्म हे दैवी देणं, लिंग भेदास नाही कारण
मुलास लाभे सन्मान, मुलीस तेथे अपमान
आहार असो वा शिक्षण, उपचारही नाही समान
मानसिकता पुरुष प्रधान, महिलांना दुय्यम स्थान ३

चोरुनि गर्भलिंग चिकित्सा, मग होई ती भ्रूणहत्या
जन्माच्या आधीच कसा हा, घाव वर्मी घालूनिया
नाकारुनी हक्क जगण्याचा, स्त्रीजन्मा कमी लेखुनिया
विज्ञानाचा वापर असा, विपरीत कर्मा करण्या ह्या४

रोडावत जाई स्त्री संख्या,संतुलना बिघडवुनिया
एकदिलाने करु प्रतिज्ञा, कलिकांचे रक्षण करण्या
अबलांना सबला करूया, आदर्श राष्ट्र निर्मूया
नरनारी रूपामधल्यामानवतेला वंदन करूया ५

डॉ. आशा प्रतिनिधि

वंधत्व निवारण्यासाठी नांदेड जिल्हाधिकारी यांनी उचलले मोलाचे पाऊल

नांदेड :- समाजामध्ये वंधत्व ही एक मोठी समस्या आहे. समाजातील गरज ओळखून आई होणे हे प्रत्येक स्त्रीचे हक्क आहे. हा हक्क तिला मिळावा तिचा संसार,कुटुंब सुखी व्हावे. यासाठी वंधत्व निवारण या विषयावर नांदेड जिल्हाधिकारी मा.अभिजीत राऊत सर यांच्या अध्यक्षतेखाली डॉ यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद नांदेड येथे जिल्हायातील उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, स्त्री रुग्णालय चे वैद्यकीय अधिक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी यांची संयुक्तिक सभा आयोजित करण्यात आली होती. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या संकल्पनेतून नांदेड जिल्ह्यातील प्रत्येक शासकीय जसे की प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, व जिल्हा रुग्णालय अशा सर्व शासकीय संस्थांमध्ये प्रत्येक आठवड्याचा एक दिवस वंधत्व निवारण ओपीडी सुरु करण्यात यावी.

ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, व जिल्हा रुग्णालय या ठिकाणी दर गुरुवारी वंधत्व निवारण केंद्र अंतर्गत ओपीडी चालु आहे. तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांद्वारे असे जोडपी शोधणे व शासकीय संस्थेत पाठवणे जेणेकरुन त्यांचे समुपदेशन, तपासणी, औषधोपचार व्हावा. 50 ते 60 टक्के जोडपी त्यांचे समुपदेशनाद्वारे वंधत्व निवारण होऊ शकते. ज्यांना तपासणी व औषधोपचाराची गरज आहे अशाना शोधून तज्ञ डॉक्टरांकडे संदर्भीत करावे. जेणेकरुन त्यांचा वेळ, आर्थिक खर्च आणि मानसिक त्रास कमी होईल. समुपदेशन, तपासणी, औषध उपचार याचा लाभ नांदेड जिल्ह्यातील सर्व वंधत्व जोडपीनी घ्यावा असे आव्हान नांदेड जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

समाजातील काही रुढी,परंपरा व सामाजिक कलंक कमी होऊन त्यांना चांगले जीवन जगता यावे. यासाठी प्रयत्न करावे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला धन्वंतरी पूजन व दिप प्रज्वलन मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आले. नांदेड येथील प्रसिद्ध डॉ. सारिका झुंजारे स्त्रीरोग तज्ज्ञ यांनी वंधत्वाचे कारणे व उपाययोजना याविषयी पीपीटी द्वारे सविस्तर माहिती दिली तसेच डॉ. नामदेव भुरे स्त्री रोग तज्ज्ञ यांनी पुरुष वंधत्त्वाची कारणे व उपाय योजनाया विषयी माहिती दिली. या कार्यक्रमाला नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल मॅडम, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख मॅडम, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सलमा हिरानी मॅडम, सह जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सतिश कोपूरवाड, डॉ. विद्या झिने मॅडम, माता बाल संगोपन अधिकारी डॉ.शिवशक्ती पवार, यांच्या उपस्थितीत बैठक झाली. सदरील कार्यक्रममाचे प्रास्ताविक अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ संजय पेरके, सूत्रसंचालन डॉ संदेश जाधव यांनी केले.

संकलन :- सत्यजीत टिप्रेसवार, नांदेड

यशस्वी बदलाची प्रेरणादायी कहाणी

IICARE FOUNDATION द्वारे समर्थित

सुरेखा कोकरे या 53 वर्षीय भगिनी ज्या आपले जीवन जिद्दीने आणि प्रामाणिकपणे जगत आहेत. बी.ए. पदवीधर असलेल्या सुरेखाताई मागील अनेक दशके आशा कार्यकर्त्या म्हणून काम करत आहेत. त्या मालेगाव प्राथमिक आरोग्य केंद्र, बारामती पुणे च्या माध्यमातून त्यांच्या गावासाठी निरंतर आरोग्य सेवा देत आहेत. त्यांचा प्रवास हा कठीण परिस्थितीतही जिद्दीने उभं राहण्याचा आणि नव्या बदलांना सामोरे जाण्याचा आहे.

कुटुंबाचा आधारस्तंभ

सुरेखाताईंच्या पतीला सध्या रोजगार नाही, त्यामुळे त्यांच्या कुटुंबाचा पूर्ण आर्थिक भार त्यांच्यावर आहे. मात्र, या जबाबदारीने त्यांना डगमगू दिले नाही. कुटुंबाची काळजी घेत, त्यांनी आपले सामाजिक कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडले. त्यांची कामासाठी असलेली निष्ठा आणि त्याग हा प्रत्येकासाठी प्रेरणादायक आहे. आशा स्वयंसेविका योजना त्यांच्यासाठी आधारस्तंभ ठरली आहे.

डिजिटल परिवर्तनाची कास

आशांसाठी असणाऱ्या व आवश्यक असणाऱ्या दिवसेंदिवस वाढणाऱ्या आरोग्य नोंदी त्यांनी वर्षानुवर्षे हाताने लिहिल्या. मात्र, आयआयकेअर फाऊंडेशन तर्फे 'मातृ' ॲप विषयीच्या प्रशिक्षणाने त्यांचा कामाचा मार्ग बदलला. सुरेखाताईंनी या ॲपचे प्रशिक्षण पूर्ण केले आणि डिजिटल तंत्रज्ञान आत्मसात केले.

सुरुवातीला डिजिटल नोंदी ठेवणे हे आव्हानात्मक होते, कारण त्यापूर्वी फक्त कागदावर च नोंदी करत होत्या. पण त्यांच्या शिकण्याच्या इच्छाशक्तीने आणि जिद्दीने त्यांनी व्हॉइस-टू-टेक्स्ट (आवाजाने नोंदणी) सारखी सोपी पद्धत आत्मसात केली. यामुळे त्यांचे काम अधिक जलद, सोपे आणि अचूक झाले. त्यांच्या या बदलाने इतर आशा कार्यकर्त्यांनाही प्रेरणा दिली आहे. आरोग्यदायी परिवर्तनासाठी त्या योगदान देत आहेत.

आरोग्य सेवेतला आधारस्तंभ

सुरेखाताई आपल्या कामातून महिलांच्या प्रसूतीपूर्व आणि प्रसूतिपश्चात काळजीपासून ते लहान मुलांच्या आरोग्यापर्यंत अनेक सेवा देतात. तसेच त्यांनी गावात आरोग्याविषयी जनजागृती करून लोकांचा विश्वास मिळवला आहे. पारंपरिक अनुभव आणि डिजिटल साधनांचा वापर करून त्यांनी गावाच्या आरोग्य व्यवस्थेत मोलाचा वाटा उचलला आहे. आरोग्य विषयक सल्ला व संवाद यामुळे त्या गावात सर्वांना परिचित आहेत.

प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व

सुरेखाताईंची कहाणी दाखवते की, वय किंवा परिस्थिती काहीही असो, जिद्द आणि शिकण्याची तयारी माणसाला पुढे नेत असते. त्यांनी केवळ स्वतःचा प्रवास सुलभ केला नाही तर इतरांसाठीही एक मार्ग दाखवला. त्यांचा संघर्ष आणि यश प्रत्येक आशा स्वयंसेविकेसाठी प्रेरणादायी आहे.

पुढे जाण्याचा निर्धार

सुरेखाताई अजूनही नव्या गोष्टी शिकण्यासाठी उत्सुक आहेत. "मातृ" ॲपसह त्यांचा प्रवास हा फक्त सुरुवात आहे. त्यांच्या कामातून त्या इतर आशा कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा देत आहेत आणि तंत्रज्ञान व पारंपरिक पद्धती यामधील अंतर भरून काढत आहेत. आरोग्य शिक्षणाद्वारे लोकांना आरोग्य साक्षर करण्याकडेही त्यांचा कल आहे.

जिद्द, चिकाटी आणि समाजासाठीच्या सेवेचं मूर्तिमंत उदाहरण आहे. अशा प्रवासांमधून खऱ्या प्रेरणादायी बदलांना सुरुवात होते आणि खऱ्या अर्थाने निरोगी महाराष्ट्रासाठी आशा स्वयंसेविकांचे योगदान महत्वाचे असल्याची जाणीव होते.

संकलन
आशा एक्सीलंस सेंटर, मुंबई

वेळ :- १ तास एकूण गुण :- ४०

प्रश्न क्र. १. योग्य पर्याय निवडा (एकुण गुण - ५)

अ) ग्राम पोषण आहार सत्राकरिता आशा स्वयंसेविकांना किती मोबदला मिळतो?
१) रु १५० **२) रु २००** ३) रु २५० ४) रु ३००

ब) जननी सुरक्षा योजनेअंतर्गत आशा स्वयंसेविकांना प्रसुतिपुर्व किती मोबदला मिळतो?
१) रु ४०० **२) रु ३००** ३) रु ६०० ४) यापैकी सर्व

क) बालकांच्या आरोग्यास गंभीर धोका असल्यास पात्र गरोदर मातांच्या [Manual vacuum aspiration MVA/ Electric vacuum aspiration EVA] पध्दतीने गर्भपात करण्याकरिता लाभार्थिंना शासकीय आरोग्य संस्थेमध्ये आणण्याकरिता मोबदला मिळतो?
१) रु १५० २) रु २०० ३) रु ३०० ४) यापैकी नाही

ड) जननी सुरक्षा योजनेअंतर्गत आशा स्वयंसेविकांना प्रसुतीपश्चात सेवा दिल्यास किती मोबदला मिळतो?
१) रु १५० **२) रु ३००** ३) रु ४०० ४) ६००

ई) एस.एन.सी.यु. उपचार घेवून आलेल्या बालकांना नियमित एच.बी.एन.सी. भेटी व्यतिरीक्त ३,६,९, व १२ महिन्यात एक वर्ष होईपर्यत भेट देवून पाठपुरावा केल्यास एकुण किती मोबदला मिळतो.?
१) रु ३०० **२) रु २००** ३) रु १५० ४) रु ५०

प्रश्न क्र. २ योग्य जोडया जुळवा. (एकुण गुण - ५)

अ) एच.बी.एन.सी. कार्यक्रम भेटी	(२)	१) प्रति डोस १००
ब) एच.बी.वाय.सी. कार्यक्रम अंतर्गत	(४)	२) माता व बाळ घरी आल्याबरोबर आशांच्या भेटी
क) अंतरा इंजेक्शन (MPA) चे चार डोसेज घेण्याकरिता महिलांनी प्रवृत्त केल्यास	(१)	३) रु १५० प्रति बालक
ड) आशांनी घरोघरी जावून मिठाच्या नमुन्याची तपासणी करणे	(५)	४) ३,६,९,१२,१५, भेटी
इ) सॅममध्ये मोडणा-या बालकास एन.आर.सी. मध्ये संदर्भित केल्यास व एन.आर.सी मधुन बाहेर आल्यानंतर सॅम बालकांचा पाठपुरावा दर महिन्याला करणे	(३)	५) रु ३०० वार्षिक प्रति

प्रश्न क्र. ३ चुक बरोबर पर्याय निवडा (एकुण गुण - ५)

१) ० ते ५ वर्ष वयोगटातील बालकांच्या मृत्युची नोंदणी केल्यास आशांना प्रति बालक रु.५० मोबदला मिळतो.
चुक/**बरोबर**

२) प्रधानतंत्री मातृ वंदना योजनेअंतर्गत बालकास दुसारा पेन्टा लावल्यानंतर रु. ५० मोबदला मिळतो.
चुक/**बरोबर**

३) ५ ते ६ वयोगटातील बालकास डी.पी.टी. दुसरा डोज बुस्टर पुर्ण केल्यास प्रति बालक रु.१०० मोबदला मिळतो.
चुक/बरोबर

४) ग्रामपातळीवर किशोरवयीन मुलींच्या बैठक आयोजीत केल्यास (वार्षिक ४ बैठका) एकुण रु २०० मोबदला मिळतो.
चुक/**बरोबर**

५) २० ते ४९ वर्ष वयोगटातील महिलांना आय.एफ.ए.गोळयांचे वाटप पुर्ण केल्यास आशांना प्रति महिना रु १०० मोबदला मिळतो.
चुक/ बरोबर

प्रश्न क्र. ४ एका वाक्यात उत्तरे द्या (एकुण गुण - ५)

१) राष्ट्रीय जंतुसंसर्ग (NDD) दिवस वर्षातुन किती वेळा साजरे केले जातात? व त्याचा किती मोबदला दिला जातो?

उत्तर : वार्षिक दोन वेळा रु.२००

२) गरोदर व स्तनदा मातेच्या एकुण किती बैठका घेणेबाबत सुचना प्राप्त आहे?

उत्तर : तीन बैठका दरमहा

३) एन.सी.डी. कार्यक्रमाअंतर्गत कोणत्या वयोगटातील व्यक्तींचा सी-बॅक फॉर्म भरणे आवश्यक आहे?

उत्तर : तीस वयोगटापेक्षा अधिक वय असलेल्या प्रत्येक व्यक्तिचा.

४) जननी सुरक्षा योजनेअंतर्गत लाभार्थी कोण असतात? व किती मोबदला दिला जातो?

उत्तर : एस सी, एस टी व बीपीएल प्रसुतिपुर्व ३०० व प्रसुतीपश्चात ३०० असे एकुण ६००

५) कुष्ठरोग नविन केस शोधल्याचा व एम.बी, पी.बी चा आशांना किती मोबदला मिळतो?

उत्तर : रु.२५० नविन केस शोधल्यास व एम.बी ६००, पी.बी ४००

प्रश्न क्र. ५ केस स्टडी / उतारा वाचून उत्तरे दया (एकुण गुण - ५)

कारंजा गावात एन.सी.डी. कार्यक्रमाअंतर्गत तोंडाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग, समस्या जास्त आहे.तुम्ही त्या गावातील आशा आहात तोंडाचा कर्करोग किंवा स्तनाचा कर्करोग होवू नये म्हणुन कोणत्या खादय पदार्थाचे सेवन करु नये तसेच कोणत्या तपासण्या कराव्यात त्या संबधी काय सुचना दयाल?

प्रश्न -

१) कार्यक्षेत्रातील कोणत्या वयोगटातील लाभार्थीचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहेत?

उत्तर : सर्वेक्षण दरम्यान १५ वर्षावरील सर्वच लाभार्थीच सर्वेक्षण करुन ४ पेक्षाजास्त गुण मिळालेल्या लोकांची तपासणी करणे.

२) तोंडाचा कर्करोगाची लक्षणे कोणती?

उत्तर : जीभेवर पांढरा,पिवळसर जाड चटटा असणे, तोंड पुर्णपणे उघडण्यास अडचण निर्माण होणे, लालसर जखमा किंवा व्रण असणे.

३) तोंडाची तपासणी करिता कोणते साहित्य आवश्यक आहे?

उत्तर : टॉर्च, हॅण्ड ग्लब्ज

४) स्तनाची तपासणी केव्हा करण्यात येते?

उत्तर : स्तनाची तपासणी ३० वर्षावरील सर्वच महिलांनी मासिक पाळिच्या चौथ्या दिवसानंतर करावी.तसेच स्तनाग्राला जाडसरपणा, गाठ किंवा स्तनातुन पु येत असल्यास प्रा.आ.केंद्रात ए.एन.एम.कडुन तपासणी करावी.

५) तोंडाचा कर्करोग होवू नये म्हणुन कोणत्या पदार्थाचा वापर टाळावा?

उत्तर : बिडी, सिगारेट, गुटखा, तंबाखु, चैनी मादक पदार्थांचा अती सेवन, गांजा यांचे सेवन टाळावे.

प्रश्न क्र. ६ प्रात्यक्षिक (एकुण गुण - ५)

हायर्पोथर्मीया व्यवस्थापन Skill Based Question :

बाळाचे शरीराचे तापमान ९५ अंश फॅरेनाईट किंवा त्याच्या खाली गेल्यास बाळाला हायपोथर्मिया झाला असे आपण म्हणतो.

व्यवस्थापन :-

१) बाळाला गरम ब्लॅकेंट मध्ये उबदार ठेवणे.

२) दारे खिडक्या बंद करणे, बाळाचे खोलीमध्ये २०० वॅट चा बल्ब लावणे,

३) बाळाला मातेच्या त्वचा संपर्कात ठेवुन स्तनपान करणे

४) बाळाला अंघोळ घालू नये याकरीता मातेला व कुटुंबियांना सल्ला व मार्गदर्शन करणे.

५) बाळाचे हात,पाय,डोके कान पुर्णपणे गरम कापडानी गुंडाळून ठेवणे.

प्रश्न क्रं. ७ खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची सविस्तर उत्तरे दया (एकुण गुण -१०)

१) एच आय व्ही/ एड्स या आजाराबाबत दहा ओळी लिहा.

१) एच.आय.व्ही. म्हणजे (Human Immuno Deficiency Virus) माणसातील रोगप्रतिकारक्षमता कमकुवत करणारा विषाणू आहे.

२) एच.आय.व्ही. च्या संसर्गामुळे एड्स होतो.

३) एड्स म्हणजे (Acquired Immunodeficiency Syndrome)

४) एच आय व्ही हा असुरक्षित लैंगिक संबंधातुन होतो.

५) एच आय व्ही बाधित मातेकडून तिच्या होणाऱ्या बाळाला होतो.

६) संसर्गाने बाधित सिरींजेस व सुयांद्वारे होतो.

७) असुरक्षित अथवा एच.आय.व्ही. संसर्गाने बाधित रक्त दिल्याने होतो.

८) एच.आय.व्ही.हस्तांदोलन केल्याने होत नाही, आलिंगन दिल्याने होत नाही, चुंबन घेतल्याने होत नाही.

९) टॉवेल, चादरी, भांडी वापरल्याने होत नाही, एकाच ताटातून खाल्याने किंवा एकाच कपातून प्याल्याने होत नाही.

१०) डास चावल्याने व एच आय व्ही/ एड्स झालेल्या व्यक्तीला स्पर्श केल्याने त्याची काळजी घेतल्याने होत नाही

२) सिकलसेल या आजाराबाबत दहा ओळी लिहा.

१) सिकलसेल हा लाल रक्त पेंशीमध्ये होणारा आजार आहे.

२) सिकल म्हणजे विळा व सेल म्हणजे पेशी म्हणून हया आजारास विळयासारखा दिसणाऱ्या (लाल रक्त) पेशींचा आजार म्हणजेच सिकलसेल आजार असे म्हणतात.

३) एका वाहक तरुणाचे लग्न तशाच वाहक असलेल्या मुलीशी झाले तर त्या दोघांमधील सिकलसेलची गुणसुत्रे त्यांच्या मुलांमध्ये येतात आणि त्यांची मुले सिकलसेल आजाराने पिडित व्यक्ती होऊ शकतात.

४) पिडित व्यक्तीला वारंवार जंतुसंसर्ग होतो व लवकर बरा होत नाही.

५) पेशीतील रक्तपुरवठा खंडीत होवुन ऑक्सीजनचा पुरवठा कमी होतो. त्या अवयवात वेदना होतात.

६) रक्तक्षयामुळे अशक्तपणा, निस्तेजपणा, थकवा व दम लागतो.

७) लघवीचा त्रास होतो, लघवीत रक्त येते व यामुळे मुत्रपिंड निकामी होवु लागते.

८) दृष्टीवर परिणाम होतो, पित्ताशयामध्ये खडे तयार होवुन अतिशय वेदना होतात व अचानक आजार वाढतो.

९) वारंवार ईजा झल्यामुळे हाडांची वाढ खुंटते व कंबरे खालील हाडांची झीज होवुन शरिराचे संतुलन बिघडते.

१०) मेंदुतील खंडीत रक्तपुरवठा यामुळे पक्षाघात होतो. असहय डोकेदुखी, अर्धांगवायु यासारखी लक्षणे दिसुन येतात.

राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र महाराष्ट्र पुणे

सर्व जिल्हानिहाय आशा स्वयंसेविका गुणानुक्रम तक्ता माहे डिसेंबर २०२४

अ.क्रं	परिमंडळ	जिल्हा	तालुका	प्राथमिक आरोग्य केंद्र	आशा स्वयंसेविकेचे नांव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक	प्राप्त गुण	मागील महिन्यात मिळालेला मोबदला (रुपये)
१	ठाणे	ठाणे	मुरबाड	म्हसा	रंजना मधुकर दिघे, मो. नं. ९२७००९७४७३	३८	१०९७०
२		रायगड	पेण	वाशी	श्रीम. त्रिवेणी संदिप म्हात्रे. मु-भाल,पो-वढाव ता-पेण,रायगड. मोबाईल नं -७७२१९१६६०२	३३	४६६५
३		पालघर	मोखाडा	खोडाळा	वैशाली सचिन किरकिरे, कुर्लोद (मानिपाडा), मो. नं. ९६९९५८१५६८	३७	२४००
४	नाशिक	नाशिक	दिंडोरी	तळेगांव दि	श्रीमती. कविता सुनिल बैरागी, दिंडोरी	४०	२०९९५
५		धुळे	धुळे	मुकटी	शोभा वणा पाटील, मो. नं. ९१७२७३७०८८	३८	६५००
६		नंदुरबार	तळोदा	सोमावल	सिमा चुनिलाल वळवी	३६	१२५७५
७		जळगाव	अमळनेर	मारवड	श्रीमती कविता विजय चौधरी	३८	७२५५
		अहमदनगर (अहिल्यानगर)	श्रीगोंदा	पिंपळगाव पिसा	श्रीमती मनिषा प्रसाद शेळके, पिंपळगाव पिसा, मो. नं ७३५०७६६९९९	३८	१६६१०
९	पुणे	पुणे	भोर	भोगवली	श्रीमती प्रतिभा राजेंद्र साळुंके.पत्ता - मु.पो.सावरदरा,ता,भोर.जि. पुणे. मोबईल नंबर- ९०११११५८९५	४०	१८०४५
१०		सातारा	खटाव	पुसेगाव	श्रीमती मंजुषा धनाजी फणसे, रा. नेर, पुसेगाव, मो. नं. ७८७५८८५२५६	३८	१४२५५
११		सोलापूर	माळशिरस	पिळिव	श्रीमती अर्चना पांडुरंग ढेरे, मु.पो. सुळेवाडी, मो. नं. ८९९९१५८३९०	३९	१३३५०
१२	कोल्हापूर	कोल्हापूर	कागल	चिखली	श्रीम. सारिका प्रविण कुराडे, मुपो गलगले मो.नं ९३५९५२८८११	४०	१५६७५
१३		सांगली	जत	डफळापूर	श्रीमती अनिता भेरवनाथ संकपाळ, शेळकेवाडी, मो. नं. ९०२२०११०२५	३९	१४३२५
१४		सिंधुदुर्ग	देवगड	मिठबांव	श्रीम.स्मिता विजय पेडणेकर, मु.पो.कातवणेश्वर, ता.देवगड, जि. सिंधुदुर्ग मोबा.क्र.७५८८९०४०२२	४०	३४९५
१५		रत्नागिरी	मंडणगड	कुंबळे	श्रीमती समिक्षा समाधान कदम, मु.पो. मुंबळे, मो. नं. ९४०५०५६७४६	३९	१४४७५
१६	औरंगाबाद	छत्रपती संभाजीनगर	वैजापुर	लाडगाव	श्रीमती ज्योती भाऊसाहेब विश्वासराव, मु.पो.पुरणगाव ता. वैजापुर, संभाजीनगर जि.छ.संभाजीनगर, मो.नं. ९८३४४१३८६०	३७	५४००
१७		जालना	परतूर	आष्टा	श्रीमती अनिता अनंत वावरे, पत्ता :- पळशी, मोबाईल क्रं. ७७७६८८४४४६	३८	१३८५०
१८		परभणी	पुर्णा	कंठेश्वर	श्रीमती अनुराधा रावसाहेब शिंदे	३८	५२०५
१९		हिंगोली	कळमनुरी	आ.बाळापुर	श्रीमती दिपमाला बाळासाहेब खिललारे, कसबे धावंडा, मो. नं. ९६८९८९८५००	४०	१६२००
२०		लातुर	लातूर	चिंचोली (ब)	श्रीमती सुवर्णा नितीन मगर रा.रामेगाव ता. लातूर जिल्हा.लातूर मो. ८६०५६६२९२८	३९	३५०७

अ.क्र.	परिमंडळ	जिल्हा	तालुका	प्राथमिक आरोग्य केंद्र	आशा स्वयंसेविकेचे नांव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक	प्राप्त गुण	मागील महिन्यात मिळालेला मोबदला (रुपये)
२१	लातुर	उस्मानाबाद (धाराशिव)	अप्राप्त				
२२		बीड	शिरुर कासार	खालापुरी	श्रीमती.सानप आशा दिनकर, रा.पाडळी ता.शिरुर कासार जि.बीड, मो. नं. ९१६८२७३६२५	३८	१४७२५
		नांदेड	नायगाव	धुप्पा	श्रीमती रेखा शेषेराव भुसावळे, धुप्पा, मो.नं. ७४९८३२०८९४	३९	७३५२
२४	अकोला	अकोला		आगर	श्रीमती कविता रविन्द्र खरात, उगवा, मो. नं. ८४५९५१५८३९	३९	५८३०
२५		वाशिम	वाशिम	तोंडगाव	श्रीमती मायावती भागवत अंभोरे (सावरगाव जिरे) ९३२५१८५०३४	३८	३४००
२६		अमरावती	चिखलदरा	सलोना	श्रीमती लक्ष्मी रमेश कास्देकर	३८	७०५५
२७		यवतमाळ	आर्णि	लोणबेळ	श्रीमती उर्मिला मुगेश मानकर रा.कोपरा ता आर्णि मो.	३८	५५५०
२८		बुलढाणा	बुलढाणा	चांडोळ	श्रीमती बिमल दिलिप भवटे, मु.पो. चांडोळ, मो. नं. ७०२८२४७०४५	३६	३९८५
२९	नागपूर	नागपुर	रामटेक	नगरधन	श्रीमती उषा विलास उपराडे	३८.५०	७२५५
३०		वर्धा	सेलू	हमदापूर	श्रीमती.विशाखा संजय शंभरकर रा.पळसगांव ता.सेलु जि.वर्धा मो.न ९९२१५४५४६४४९	३९	१५७९५
३१		भंडारा	साकोली	एकोडी	श्रीमती प्रमिला विलास पोगळे, मु.पो.एकोडी ता.साकोली जि. भंडारा, मो. नं. ८६९८०४९४०१	४०	१४५८०
३२		गोंदिया	अर्जुनी/मोर.	गोठणगांव	श्रीमती अरुना प्रकाश काले मु. जरु घाटा	३५	६६१५
३३		चंद्रपूर	चंद्रपूर	दुर्गापुर	श्रीमती शालीनी अशोक गोंगले, नेरी झोपडपट्टी, मो. नं. ९९२३२७२५७०	४०	१४७२५
३४		गडचिरोली	वडसा	कोरेगांव	सौ माधुरी योगाजी टिकले त.वडसा जिल्हा गडचिरोली	३८	५८०३५

कुष्ठरुग्ण शोध अभियान

दि. ३१ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२५

कुष्ठरोगाची लक्षणे

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम

शरीराच्या कोणत्याही भागातील त्वचेवर असणारा फिकट लालसर चट्टा

चकाकणारी तेलकट त्वचा व अंगावरील गाठी

हाता-पायांमध्ये बधिरता व शारीरिक विकृती

- अभियाना दरम्यान प्रत्येक गावातील प्रत्येक कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीची तपासणी करून घेणे आपल्या हिताचे आहे.
- संशयित कुष्ठरुग्णांनी नजीकच्या शासकीय/निमशासकीय आरोग्य संस्थेमध्ये जाऊन निदान निश्चीत करून घेणे आवश्यक आहे.
- निदाननिश्चीतीनंतर तात्काळ व पूर्ण उपचार घ्यावा

आपल्या घरी येणा-या प्रशिक्षित स्वयंसेवकांकडून तपासणी करुन घ्यावी आणि त्यांना सहकार्य करावे.

लक्षात ठेवा !
लवकर निदान - लवकर उपचार
निरोगी ठेवा आपला परिवार

अधिक माहितीसाठी टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक (कुष्ठरोग)
022-24114000

कविता

ताई, माई आक्का
विचार करा पक्का,
जन्मतःच 'बीसीजी'' द्या बाळा,
त्यामुळे मिळेल क्षयरोगावर आळा !

ताप, दीर्घकालीन खोकला,
यावर करू नका दुर्लक्ष,
नियमित औषधोपचार करण्यावरती,
द्या तुम्ही लक्ष !

शिंकताना, बोलताना,
ठेवा तोंडावरती, नाकावरती हात,
क्षयरोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी,
मिळेल तुमचीच साथ!

अस्वच्छ, रोगट वातावरण बदलवूया,
हात पाण्याने नेहमी स्वच्छ धुवूया,
गैरसमज समाजातील होतील दूर,
जीवन जगण्याला भेटेल नवा सूर !

किती जीव गेलेत सोडून क्षयाने,
आता रोग हा संपवू निश्चयाने,
सगळीकडे लावू आता एकच नारा,
'क्षयमुक्त होवो देश हमारा"...!

कवयित्री - दिक्षिता द. साटम
रिद्धी गार्डन, आपला दवाखाना,
मो. नं. 7758047998

एएफएमसी नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी राज्य आरोग्य शिक्षण आणि संपर्क विभाग, पुणे येथे भेट दिली. यावेळी डॉ. कैलास बाविस्कर, उपसंचालक, आरोग्य सेवा व डॉ. संजयकुमार जठार, सहायक संचालक यांनी विभागाच्या कामकाजाविषयी माहिती दिली.

भारतातील क्षयरोगमुक्त शहरी गरीब समुदाय प्रकल्पाचा शुभारंभ

पुणे - सेंट्रल टीबी डिव्हिजन, सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र, जॉन्सन अँड जॉन्सन, पाथ, आणि टीबी अलर्ट इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 16 जानेवारी 2025 रोजी "Take Charge Against TB" program for TB Free Urban slums. या नवीन प्रकल्पाचे उद्घाटन पुण्यामध्ये करण्यात आले. या वेळी डॉ. कैलास बाविस्कर उपसंचालक आरोग्य सेवा आयईसी, डॉ. कानगुले, सहायक संचालक टीबी, डॉ. प्रशांत बोठे, शहरी टीबी अधिकारी पुणे महानगरपालिका, यांनी मार्गदर्शन केले

तसेच या कार्यक्रमासाठी जॉन्सन अँड जॉन्सन च्या श्रीमती कात्या वाजपाई, श्रीमती तनिषा दास, पाथ संस्थेचे उपसंचालक डॉ. दिपक बालसुब्रमण्यम, श्री कासिम सय्यद ,टीबी अलर्ट इंडिया, डॉ. सतिश ताजने राज्य प्रमुख, पाथ, श्री. सत्यजित गोजमे, शासकीय आरोग्य अधिकारी, खासगी आरोग्य संस्था आणि केमिस्ट असोसिएशनचे प्रतिनिधी उपस्थित होते.

हा प्रकल्प मुख्यता पुणे महानगरपालिका हद्दीतील येरवडा आणि विश्रांतवाडी या दोन वस्तींमध्ये प्रायोगिक तत्वावर राबविला जाईल आणि याचा मुख्य उद्देश फ्रंटलाईन आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन सशक्त करणे आणि तरुण स्वयंसेवकांना प्रोत्साहित करून क्षयरोग दूरीकरणासाठी आरोग्य प्रणालीशी जोडणे हा आहे!

येरवडा येथील प्रादेशिक मनोरुग्णालयात अद्ययावत मशीनद्वारे होणार मानसिक उपचार

पुणे - सध्याच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक आजारावर उपचार घेण्याऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यासाठी रुग्ण लवकरात लवकर बरा होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नवीन अद्ययावत यंत्राची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा, पुणे येथे पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा इतर ठिकाणांहून मनोरुग्ण उपचारासाठी प्रतिदिन येत असतात. प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा, पुणे येथे नवीन अद्ययावत मशीनद्वारे मानसिक उपचार सुरु झाले आहे. या मशीनचे उद्घाटन रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. श्रीनिवास कोलोड यांच्या हस्ते संपन्न झाले.

सदरील उपचार बाह्यरुग्ण विभागात उपलब्ध असून त्यासाठी कोणतीही प्राथमिक शारीरिक चाचणी व भुल देण्याची आवश्यकता नाही. हे उपचार संपुर्णतः विनामूल्य व परिणामकारक असून त्याचा लाभ जास्तीत जास्त रुग्णांनी घ्यावा, असे आवाहन डॉ. कोलोड यांनी केले आहे. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून मुख्य प्रशासकीय अधिकारी, श्री. प्रशांत बडगीरे, श्रीमती. संगिता दुबे, अधिपरिचारीका उपस्थित होते.

या अद्ययावत यंत्रास रिपीटेटीव ट्रान्सक्रानिअल मॅग्नेटीक स्टिम्युलेशन (आरटीएमएस) उपचार असे म्हणतात. या उपचाराचा फायदा नैराश्य, चिंता, ताण-तणाव इ. मानसिक आजारावर करता येईल. या उपचारामध्ये मेंदूस चुंबकीय लहरींद्वारे उपचार दिले जातात. आरटीएमएस मशीनद्वारे उपचार पद्धती खासगी रुग्णालयात महागडी असून प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा, पुणे येथे मोफत दिली जात आहे. महाराष्ट्र शासनाकडून मनोरुग्णास या उपचाराचा जास्तीत जास्त फायदा मिळावा म्हणून ही सुविधा प्रथम प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा, ठाणे येथे दि. 17/01/2025 रोजी पासून उपलब्ध करुन दिली आहे. रुग्णालयातील आंतररुग्ण व बाह्यरुग्ण येथील उपचार घेणारे सर्व रुग्ण याचा लाभ शकतील. या उपचार व मशिनबद्दल सविस्तर माहिती वरिष्ठ मनोविकारतज्ञ, डॉ. संदीप महामुनी, यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीम. रोहिणी भोसले, समाज सेवा अधीक्षक, यांनी केले. या कार्यक्रमास रुग्णालयीन अधिकारी, कर्मचारी वर्ग व तसेच रुग्ण व नातेवाईक उपस्थित होते.

"देश का प्रकृती परीक्षण अभियान"
छत्रपती संभाजीनगर जिल्हा राज्यात दुसऱ्या क्रमांकावर

आयुष मंत्रालय भारत सरकारच्या वतीने देशभरात "देश का प्रकृती परीक्षण अभियान" राबविण्यात आला होता. या अभियानात शासन सेवेतील वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत केलेल्या प्रकृती परीक्षणात छत्रपती संभाजी नगर जिल्हा 20000 पेक्षा जास्त परीक्षणे नोंदवून राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आला आहे.

29 ऑक्टोबरला आयुर्वेद दिवसाच्या कार्यक्रमांमध्ये मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देश का प्रकृती परीक्षण अभियानाची घोषणा केली होती, यानुसार 25 नोव्हेंबर ते 25 डिसेंबर पर्यंत आयुर्वेद आर्हता धारक प्राध्यापक, विद्यार्थी, खाजगी व्यावसायिक व शासन सेवेतील वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत 18 ते 70 वर्ष वयोगटातील एक कोटी लोकांचे प्रकृती परीक्षण करण्याचा उद्दिष्ट समोर ठेवून संपूर्ण देशभरात प्रकृती परीक्षण अभियान राबविण्यात आला. अभियानाची सुरुवात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या प्रकृती परीक्षणांने झाली होती.

श्री विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी

अभियानाच्या सुरुवातीला आयुर्वेद महाविद्यालयातील प्राध्यापक, पदवीत्तर विद्यार्थी व प्रशिक्षणार्थी डॉक्टरांमार्फत प्रकृती परीक्षण करण्यात आले. परंतु देशाचे आयुष मंत्री आदरणीय प्रतापरावजी जाधव यांच्या सूचनेनंतर या अभियानात शासकीय सेवेतील आयुर्वेद वैद्यकीय अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला.

या अभियानात शासकीय सेवेतील आयुर्वेद आर्हता धारक वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सहभाग घेण्यासाठी आयुक्त आरोग्य सेवा, श्री आमगोथु रंगा नाईक व सहाय्यक संचालक आयुष डॉ. आर.एस. हंकारे यांनी दिनांक 11 नोव्हेंबर रोजी विशेष व्हिडिओ कॉन्फरन्सिंग घेऊन सर्व जिल्हा शिल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना राज्यातील सर्व आरोग्य संस्थांत प्रकृती परीक्षण करण्यास सूचित केले होते.

याशिवाय भारतीय चिकित्सा प्रणालीच्या राष्ट्रीय आयोगाचे अध्यक्ष डॉ जयंत पुजारी, आयुष संचालक डॉ. रामन घुंगराळेकर, भारतीय चिकित्सा पद्धतीचे महाराष्ट्र कौन्सिलचे अध्यक्ष डॉ आशुतोष गुप्ता, प्रकृती परीक्षण अभियानाचे महाराष्ट्र राज्य समन्वयक डॉ. दत्तात्रय पाटील व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे शाखा अधिष्ठाता प्राचार्य डॉ. श्रीकांत देशमुख यांनी दिनांक 13 व 19 डिसेंबर रोजी राज्यातील आयुर्वेद वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण घेऊन आयुष मंत्रालयाच्या ॲपद्वारा प्रकृती परीक्षण करण्यात येणारे अडचणीवर मार्गदर्शन केले.

प्रकृती परीक्षण करण्यासाठी आयुष मंत्रालयाने विशेष ॲप तयार केले आहे. या एकच ॲपवर सामान्य नागरिक व आयुर्वेद डॉक्टरांना लॉगिन करण्याची सोय देण्यात आलेली आहे. आयुर्वेद डॉक्टरांना प्रकृती परीक्षण करण्यासाठी एम.सी.आय.एम. कौन्सिलचा नोंदणी क्रमांक अनिवार्य करण्यात आलेला आहे, सबब केवळ आयुर्वेद डॉक्टरांनाच प्रकृती परीक्षण करता येते. सामान्य नागरिकांनी प्रकृती

परीक्षण ॲपवर स्वतःचं नाव, वय व पूर्वीचे आजार अशी माहिती भरल्यानंतर क्यू आर कोड तयार होतो. या क्यू आर कोडला आयुर्वेद डॉक्टरांद्वारे स्कॅन करून 22 मुद्द्यांचे आधारे नागरिकांची शारीरिक तपासणी व प्रश्न विचारून प्रकृती परीक्षण केले जाते.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आयुर्वेद-युनानी दवाखाने व आरोग्यवर्धिनी केंद्रातील आयुर्वेद अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आयुष वैद्यकीय अधिकारी व आर. बी. एस. के. वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रकृती परीक्षण अभियानात सहभागी करण्यासाठी जिल्हा आयुष कक्षाचे नियंत्रणात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अभय धानोरकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ दयानंद मोतीपवळे व जिल्हा आयुष अधिकारी डॉ शेख शकील यांनी विशेष नियोजन केले.

या अभियाना अंतर्गत स्वतः मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विकास मीना, आरोग्य उपसंचालक डॉ. कांचन वानेरे, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी स्वतःचा प्रकृती परीक्षण करून घेतला. याप्रसंगी जिल्ह्यात सर्वात जास्त प्रकृती परीक्षण करणारे डॉ मोनम डव्हळे (641) बनोटी ता. सोयगाव, डॉ. परमेश्वर फालके (533) उपजिल्हा रुग्णालय सिल्लोड व जिल्हा रुग्णालयातील डॉ रवींद्र बोर्डे (312) डॉ पठाण सारा अंजुम (303) डॉ जयश्री पवार (302) व डॉ सोनाली गोंडगे (300) यांचा जिल्हा शल्य चिकित्सक डॉ दयानंद मोतीपवळे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अभय धानोरकर यांनी अभिनंदन केले.

जिल्ह्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत प्रकृती परीक्षण अभियानाच्या नियोजनात डॉ बाळकृष्ण लांजेवार अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ प्रशांत बडे निवासी वैद्यकीय अधिकारी जिल्हा रुग्णालय, डॉ सारिका लांडगे, साथरोग वैद्यकीय अधिकारी, श्रीमती विद्या सानप जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ अनीसा पठाण, डॉ खालीद पठाण श्री अशोक, मनोज देशपांडे सिनेयंत्र चालक श्रीमती शारदा कांबळे आयुष डाटा ऑपरेटर यांनी मोलाचा योगदान दिले आहे.

आरोग्य राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते थॅलेसेमिया सपोर्ट ग्रुपच्या सचित्र पुस्तिकेचे प्रकाशन

प्रजासत्ताक दिनानिमित्त आज थॅलेसेमिया सपोर्ट ग्रुपच्या माध्यमातून 2015 पासून आजपर्यंत करत असलेल्या कामाच्या सचित्र पुस्तिकेचे प्रकाशन मा आरोग्य राज्यमंत्री तथा पालक मंत्री श्रीमती मेघनादिदी साकोरे बोर्डीकर, मा जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नितिशा माथूर व जिल्हा पोलिस अधीक्षक श्री रवींद्र सिंह परदेशी यांच्या हस्ते करण्यात आले व आजपर्यंत करत असलेल्या कामाचा गौरव करण्यात आला.

लेखकांना विनंती

वाचकांचे मनोगत हे सदर लवकरच सुरु करीत आहोत,
तरी लेखांविषयी आपल्या प्रतिक्रिया व अभिप्राय ई-मेल आयडीवर अवश्य कळवावा.
e-mail: ddhsiec.creatives@gmail.com

- महाराष्ट्र आरोग्य पत्रिकेत आरोग्यासंबंधीच्या विषयांवर लेख, कविता,यशकथा इत्यादी साहित्य प्रकाशित केले जाते.
- साहित्य अप्रकाशित असावे. लेख मुख्य संपादक तथा उपसंचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.ब्युरो) राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, परिवर्तन इमारत, आरोग्य भवन, विश्रांतवाडी पोलिस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे 411006 या पत्त्यावर पाठवावेत. लेखकांनी स्वतःचा पूर्ण पत्ता दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी लिहावा.
- केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षा क्षेत्र अनुभवांवरील साहित्याला प्राधान्य देण्यात येते. फक्त मराठी भाषेतील मजकुर प्रसिद्ध होतो.
- लेख/साहित्य प्राप्त झाल्यावर निवड समितीच्या मान्यतेने साहित्याची निवड केली जाते. अस्वीकृत साहित्य परत पाठविणे शक्य होत नाही. आपले लेख कागदाच्या एका बाजूस सुवाच्च अक्षरात लिहून किंवा टंकलिखित करुन पाठवावेत. शब्द संख्या 700 ते 800 असावी.
- अपेक्षित महिन्यापूर्वी किमान दोन महिने अगोदर संबंधित लेख या कार्यालयास प्राप्त झाल्यास छपाईचे योग्य काम योग्य वेळेत पूर्ण होऊ शकते. पुढील 3 महिन्यांसाठीचे विषय पुढे दिले आहेत.

आरोग्य पत्रिकेसाठी पुढील महिन्यांसाठीचे विषय

फेब्रुवारी २०२५

- **४ फेब्रुवारी** जागतिक कर्करोग दिन
- **५ फेब्रुवारी** मौखिक आरोग्य दिन
- **१० फेब्रुवारी** राष्ट्रीय जंतनाशक दिन
- **११ फेब्रुवारी** जागतिक रुग्ण दिन व जागतिक युनानी दिन
- **१२ फेब्रुवारी** प्रजनन आरोग्य जागरूकता दिन

मार्च २०२५

- **८ मार्च** जागतिक महिला दिन व धूम्रपान विरोधी दिन
- **९ मार्च** जागतिक मूत्रपिंड दिन
- **१० मार्च** गर्भधारणेतील मधुमेह जागरूकता दिवस
- **१२ ते १८ मार्च** जागतिक काचबिंदू सप्ताह
- **१६ मार्च** गोवर लसीकरण दिन
- **मार्च महिन्यातील दुसरा गुरुवार** जागतिक मूत्रपिंड दिन

मार्च २०२५

- **२० मार्च** जागतिक मौखिक आरोग्य दिन
- **२१ मार्च** जागतिक डाऊन सिंड्रोम दिन
- **२२ मार्च** जागतिक जल दिन
- **२३ मार्च** जागतिक हवामान दिन
- **२४ मार्च** जागतिक क्षयरोग दिन

एप्रिल २०२५

- **१ ते ७ एप्रिल** अंधत्व प्रतिबंध सप्ताह
- **२ एप्रिल** जागतिक ॲटीझम जनजागृती दिन
- **७ एप्रिल** जागतिक आरोग्य दिन
- **११ एप्रिल** जागतिक सुरक्षित मातृत्व दिन
- **१४ एप्रिल** आयुष्यमान भारत-आरोग्यवर्धिनी केंद्र दिन
- **१७ एप्रिल** जागतिक हेमोफिलीया दिन
- **१९ एप्रिल** जागतिक यकृत दिन
- **२२ एप्रिल** पृथ्वी दिन
- **२४ ते ३० एप्रिल** जागतिक लसीकरण सप्ताह
- **२५ एप्रिल** जागतिक हिवताप दिन

(या अंकातील सर्व मते लेखकांची असून त्यांच्याशी संपादक मंडळ व शासन सहमत असतीलच असे नाही. तसेच लेखातील विषयाबाबत अधिक माहितीसाठी कृपया लेखकांशी संपर्क साधावा)

पत्र व्यवहारासाठी पत्ता

मुख्य संपादक, महाराष्ट्र आरोग्य पत्रिका तथा उपसंचालक आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, परिवर्तन, आरोग्य भवन परिसर, विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर, येरवडा,

विभाग स्तरीय रुग्णवाहिका व लसवाहिका लोकार्पण सोहळा

सार्वजनिक आरोग्य विभाग, कोल्हापूर विभाग स्तरावरील कार्यक्रमामध्ये रुग्णसेवेचा दर्जा उंचावण्यासाठी ६ प्राथमिक आरोग्य केंद्रांना रुग्णवाहिका (ॲब्युलन्स) व सिंधुदुर्ग व सांगली जिल्ह्यासाठी ३ व ०१ व्हॅक्सिन व्हॅनचे लोकार्पण मा. नाम. प्रकाश आबिटकर, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालक मंत्री, कोल्हापूर जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली शेंडा पार्क येथे आरोग्य व कुटुंब कल्याण केंद्र, कोल्हापूर आवारामध्ये एका कार्यक्रमात 26 जानेवारी रोजी करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी कोल्हापूर जिल्ह्याचे मा. जिल्हाधिकारी अमोल येडगे, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेन एस., उपसंचालक, आरोग्य सेवा कोल्हापूर मंडळ कोल्हापूर डॉ. दिलीप माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुध्द पिंपळे, प्राचार्य कु.क. प्रशिक्षण केंद्र कोल्हापूर डॉ. योगेश साळे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुप्रिया देशमुख, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. हर्षला वेदक, जिल्हा कुष्ठरोग अधिकारी डॉ. पालेकर व जिल्ह्यातील आरोग्य विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

Registered
Maharashtra Arogya Patrika (Marathi)
RNI No. MAHMAR/2000/1736
The date of Publication is 24th January 2025

राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम

प्रत्येकाची काळजी घेवू,
टीबी मुक्त भारत अभियान राबवू

आवाहन

राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम - १०० दिवस मोहीम

- मा. पंतप्रधान, श्री. नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने व मा. मुख्यमंत्री, श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे व श्री. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात २०२५ अखेर क्षयरोग मुक्त भारत मोहीम राबविली जात आहे.
- क्षयरोग दूरीकरणाचा भाग म्हणून दिनांक ७ डिसेंबर ते २४ मार्च या १०० दिवस कालावधीत राज्यातील १७ जिल्हे व १३ महानगरपालिका क्षेत्रात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.
- या क्षयरोग दुरीकरण मोहिमेत अति जोखमीच्या असलेल्या झोपडपट्टी, वीटभट्टी कामगार वस्ती, विडी कामगार, भटक्या व स्थलांतरित तसेच खाण कामगार, बेघर, तुरंग, वृद्धाश्रम, आश्रमशाळा या घटकांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.
- या मोहिमेदरम्यान आरोग्य कर्मचारी, स्वयंसेवकांमार्फत सर्वेक्षण करण्यात येणार आहे. क्षयरोगाची लक्षणे आढळल्यास छातीचा एक्स-रे व बेडका नमुना तपासणी करून निदान करण्यात येऊन उपचार करण्यात येणार आहेत.
- या मोहिमेत जास्त क्षयरोग असलेल्या भागांचे मॅपिंग करण्यात येऊन यात 60 वर्षावरील व्यक्ती, मागील पाच वर्षांतील टीबी बाधित रुग्ण, टीबी संपर्कातील व्यक्ती, धूम्रपान करणारे, मधुमेही, एच. आय. व्ही. बाधित तसेच इतर जोखीम गट यांची तपासणी करण्यात येणार आहे.
- क्षयरोग मुक्तीसाठी सर्वांचा सहभाग हा महत्त्वाचा असून जनभागीदारीद्वारे ही मोहीम यशस्वी होणार असल्यामुळे आपण या मोहिमेत सहभागी व्हावे व ही मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

क्षयरोगाला दूर करूया, निरोगी महाराष्ट्र घडवूया !

Monthly Maharashtra Arogya Patrica is printed and published by Dr. Kailas B. Baviskar on behalf of Public Health Department, Government of Maharashtra
It is Printed at Kalyani Corporation, 1464, Sadashiv Peth, Pune 30. and Published at Maharashtra State Health I.E.C. Bureau, Parivartan', Arogya Bhavan Compound, Opp. Vishrantwadi Police Station, Yerawada, Pune 411 006.